गुरुवार, ४ जानेवारी २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १४१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 4 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-141 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05

## रायगड जिल्ह्यातील पक्षी निरीक्षकांनी केली पाईड व्हिटीयर पक्षाची नोंद

आधुनिक केसरी न्यूज

**विठ्ठल ममताबादे**

**उरण :** हिवाळा लागताच महाराष्ट्रात स्थलांतरीत पक्षी फार मोठ्या संख्येने यायला सुरुवात करतात. त्यामुळे पक्षी निरीक्षक आणि वन्यजीव छायाचित्रकारांमध्ये कमालीचा उत्साह पाहायला मिळत असतो. रायगड जिल्ह्यातील पक्षी निरीक्षक वैभव पाटील, हरीश पाटील आणि सुरेंद्र पाटील हे साताऱ्यात असताना त्यांना साताऱ्यातील शिरवळ गावाजवळ शेतामध्ये 'पाईड व्हीटियर' या पक्षाचे दर्शन झाले. विशेष म्हणजे हा पक्षी यापूर्वी महाराष्ट्रात पाहिला गेलेला नसल्याने महाराष्ट्राच्या पक्षी वैभवात एका नवीन पक्षाची भर पडलेली आहे. ओल्ड वर्ल्ड फ्लायकॅचर कुळातील हा पक्षी युरोप ते आफ्रिका आणि आग्नेय आशिया या भागात स्थलांतर करणारा असून तो भटकून महाराष्ट्रात आल्याची शक्यता पक्षी निरीक्षकांनी नोंदविली आहे. पाईड व्हीटियर या पक्षाच्या भारतातील लडाख, हिमाचल प्रदेश, पश्चिम बंगाल, सिक्कीम, कर्नाटक अशा काही मोजक्याच नोंदी आहेत. वैभव पाटील, हरीश पाटील आणि सुरेंद्र पाटील हे रायगड जिल्ह्यातील पक्षी निरीक्षक 'बहराई फाउंडेशन'मार्फत गेली काही वर्षे पर्यावरणाशी संबंधित कामे करत आहेत. त्यांनी रायगड जिल्ह्यात रेड क्रेस्टेड पोचार्ड आणि कॉमन क्वेल या पक्षांची पहिली नोंद केलेली आहे. इ-बर्ड या पक्षी निरीक्षण नोंदीच्या जागतिक संकेत स्थळावर रायगड जिल्ह्यामधून सर्वाधिक प्रजातींच्या नोंदी केलेल्या आहेत.





भारतातल्या पहिल्या महिला शिक्षिका आणि स्त्रीशिक्षणासाठी आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या १९२ व्या जयंतीनिमित्त यांचे जन्मगाव असलेल्या साताऱ्यातल्या नायगावात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, छगन भुजबळ, शंभूराज देसाई, अतुल सावे, रुपाली चाकणकर, नरेंद्र पाटील, आ. महादेवराव जानकर, आ. जयकुमार गोरे, आ. मकरंद पाटील, आ. महेश शिंदे उपस्थित होते.

## मोदी-शाह यांनी शिंदे-फडणवीस आणि अजित पवारांनाही गुजरातला घेऊन जावे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** केंद्र सरकारच्या मदतीने सत्तेवर आलेल्या असंवैधानिक शिंदे फडणवीस अजित पवार सरकारच्या काळात दररोज महाराष्ट्राला लुटले जात आहे. वेदांता फॉक्सकॉन, टाटा एअर बस, मुंबईतील हिरे व्यापारानंतर आता राज्याच्या सहकार क्षेत्रावरही हल्ला केला जात असून सहकार क्षेत्रातील एक महत्वाचा व नावाजलेला दुग्ध प्रकल्प 'महानंद' डेअरी गुजरातच्या दावणीला बांधला जात आहे, असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला आहे.भाजपा सरकारचा समाचार घेताना काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे पुढे म्हणाले की, मुंबई, महाराष्ट्र लुटण्यासाठीच तोडफोडीचे राजकारण करुन भाजपाने सत्ता बळकावली आहे. महाविकास आघाडी सरकार गुजरात लॉबीच्या कुटील हेतूंच्या आड येत होते,गुजरात लॉबीसमोर होयबा करत नव्हते म्हणूनच सरकार पाडले व मागील दीड वर्षात महाराष्ट्राची अक्षरशः लुट सुरु आहे परंतु मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहांना नाही म्हणण्याची हिम्मतच नाही. राजरोसपणे महाराष्ट्रावर दरोडा टाकून लुटले जात असताना हे तिघेजण फक्त बघ्याची भूमिका घेत आहेत. शिंदे, फडणवीस व अजित पवार हे मोदी शहांसमोर फक्त 'सह्याजीराव' आहेत, दिल्लीने दिलेल्या आदेशानुसार फाईलवर सही करणे एवढेच त्यांचे काम आहे. महाराष्ट्रात सहकार क्षेत्राने समृद्धी आणली, ग्रामीण भागात या सहकारने आर्थिक प्रगती केली पण याच सहकारावर आता मोदी-शहांची वक्रदृष्टी पडली आहे.

## यापुढे सरकारशी चर्चा बंद

### जरांगे : सरकारच्या अडचणी वाढण्याची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**जालना : मनोज जरांगे यांनी आता सरकारसोबतच्या चर्चेला पूर्णविराम देण्याची घोषणा केली आहे. आंतरवाली सराटीमध्ये बुधवारी मनोज जरांगे आणि मुंबई येथील मराठा आंदोलकांमध्ये बैठक झाली. याच बैठकीत बोलताना मनोज जरांगे यांच्याकडून याबाबत घोषणा करण्यात आली आहे. मुंबईकर आणि माझ्यासह यापुढे कोणीही मराठा आंदोलक सरकारशी चर्चा करणार नाही, असे जरांगे यांनी म्हटले आहे. जरांगे यांच्या या निर्णयामुळे आता सरकारच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. कारण चर्चाच बंद झाली तर मराठा आरक्षणावर तोडगा कसा निघणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**

यावेळी बोलताना जरांगे म्हणाले की, 20 जानेवारीला मुंबईकडे निघणार असून, तब्बल 2 कोटी मराठे मुंबईत येतील. आता मुंबईतल्या आंदोलकांच्या खांद्यावर समाजाची जबाबदारी आहे. तसेच, इथून येणाऱ्या आंदोलकांची जबाबदारी मुंबईच्या आंदोलकांवर असणार आहे. आपल्याला चारही बाजूने घेरले, तर आपण 10 बाजूने घेरू यात. मुंबई आंदोलनासाठी दीड लाख स्वयंसेवक तयार करत आहोत. वकिलांची 200 जणांची टीम असून, 1500 डॉक्टरांची टीम लागणार आहे. दीड महिन्याचे अन्न सुरवातीला घेऊन जाणार आहे. मुंबईला जाताना रस्त्याने पिकांचे नुकसान होणार नाही, याची खबरदारी घ्यायची आहे. तसेच, मुंबईकर आणि माझ्यासह यापुढे कोणीही मराठा आंदोलक सरकारशी चर्चा करणार नाही, असेही जरांगे म्हणाले आहेत.

माझी प्रत्येक भूमिका मी मराठा बांधवांच्या समोरच मांडत असतो. सरकारशी होणाऱ्या बैठका देखील मी सर्वांसमोरच करतो. मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत दुसरे कोणी असते तर गुपचूप बैठक करून देखील आला असता. पण मला समाजाशी गद्दारी करायची नाही. यासाठी मेलो तरीही चालेल. मला मी पणा सुद्धा चालत नाही. मराठा समाजाला एवढीच संधी आहे. आता सर्व काही जवळ आले असून, फक्त एका शब्दावर आपले सगळे गुंतले आहे. एका नोंदीवर 70 जणाला लाभ देण्यात आले आहे. तसेच आजपासून पुन्हा शिंदे समिती कामाला लागणार असल्याचे देखील जरांगे म्हणाले.

**सगेसोयऱ्याचा सरकारने वेगळाच अर्थ काढला :** ज्यांची नोंद मिळाली आहे त्यांच्या सगेसोयऱ्यांना सुद्धा लाभ मिळावा अशी आपली मागणी आहे. ज्यांच्यामध्ये नाते जुडतात त्यांना सोयरे म्हणतात. नातं असलं तरच ग्रामीण भागात मुलगी देतात किंवा करतात. त्यामुळे ज्यांची नोंद मिळाली त्यांच्या सोयऱ्यांना देखील त्याचा लाभ द्यावा अशी आपण मागणी केली होती. मात्र, सरकारने याचा वेगळाच अर्थ काढला आहे. चुलता आणि पुतण्याला सरकार सोयरे समजतात. आता दोन दिवसात यावर निर्णय घेऊन बैठक करू असे सरकारकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे असे झाल्यास एकही मराठा आरक्षणापासून वंचित राहत नाही, असे जरांगे म्हणाले आहे.




**'ते' चार शब्द सरकारचेच :** पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले की, "सरकारला सोयरे हा शब्द आपण दिला नव्हता. त्यांचे न्यायमूर्ती आले होते. सोबत सहा मंत्री होते. यावेळी गायकवाड समितीचे अध्यक्ष देखील आले होते. त्यांनी काही सचिव सोबत आणले होते. त्यांनी आरक्षणावर, घटनेवर अभ्यास करणारे तज्ञ देखील आणले होते. घटनेत आरक्षण बसणार का आणि नाही बसल्यास कोणते शब्द टाकावे यासाठी देखील काही लोकं आणले होते. ज्यांची नोंद मिळाली त्यांच्या सर्व कुटुंबाला लाभ द्यायचा, नोंद मिळालेल्या व्यक्तीच्या संबंधित नातेवाईकांना लाभ द्यायचा, नोंद मिळालेल्या व्यक्तीच्या सगेसोयऱ्यांना लाभ मिळणार आणि मागेल त्या मराठयांना आरक्षणाचा लाभ मिळेल हे चार शब्द त्यांनीच सांगितले होते, असेही जरांगे म्हणाले.

## हिंडेनबर्ग प्रकरणी अदाणी समूहाला न्यायालयाचा दिलासा


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** अदाणी हिंडेनबर्ग प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आला असून, अदाणी समूहाला मोठा दिलासा मिळाला आहे. सुप्रीम कोर्टाने एसआयटी तपास नाकारला असून, सेबीला चौकशी करण्यास सांगितले आहे. बाजार नियामक सेबीच्या अधिकारक्षेत्रात हस्तक्षेप करण्याचे मर्यादित अधिकार आहेत, जे अदाणी समूहावरील हिंडेनबर्गच्या आरोपांची चौकशी करीत आहेत. मुख्य न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. परडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने सर्वोच्च न्यायालय सेबीच्या तपासात हस्तक्षेप करणार नाही, असा निकाल दिला. उर्वरित २ प्रकरणांची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने सेबीला ३ महिन्यांची मुदत दिली आहे. २४ नोव्हेंबर रोजी मुख्य न्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने अदाणी-हिंडेनबर्ग वादाशी संबंधित विविध याचिकांवर आपला निर्णय राखून ठेवला होता. सेबीची चौकशी योग्य असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.सेबीने २४ पैकी २२ प्रकरणांची चौकशी केली आहे. उर्वरित दोन प्रकरणांचा तपास दोन महिन्यांत पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे आदेश देत आहोत. सेबी ही सक्षम प्राधिकरण आहे. ओसीसीपीआरच्या अहवालाच्या आधारे सेबीच्या तपासावर शंका घेता येणार नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. एवढेच नाही तर सेबीकडून एसआयटीकडे तपास सोपवण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली होती.



हिंडेनबर्ग-अदाणी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले आहे की, या प्रकरणाची चौकशी फक्त सेबी करणार आहे. तपास एसआयटीकडे वर्ग केला जाणार नाही. या तपासासाठी सेबी ही सक्षम एजन्सी आहे, त्यामुळे आम्हाला त्यात हस्तक्षेप करण्याची गरज नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाने भारत सरकार आणि सेबीला भारतीय गुंतवणूकदारांचे हित मजबूत करण्यासाठी तज्ज्ञ समितीच्या शिफारशीनुसार कार्य करण्यास सांगितले आहे. न्यायालयाने सेबीला विद्यमान नियामक प्रणाली सुधारण्यासाठी तज्ज्ञ समितीच्या सूचनांवर काम करण्यास सांगितले आहे. एवढेच नाही तर तज्ज्ञ समितीच्या सदस्यांवर उपस्थित केलेले प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावत याचिकाकर्त्यांचा हितसंबंधांच्या संघर्षाचा युक्तिवाद निरर्थक असल्याचे म्हटले आहे. न्यायालयाने म्हटले की, ठोस कारणाशिवाय सेबीकडून तपास हस्तांतरित करण्याचा कोणताही आधार नाही. मीडिया रिपोर्ट्सच्या आधारे सेबीच्या तपासावर शंका घेणे किंवा कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचणे योग्य नाही. अशा प्रकारे अदाणींना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे.

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

२०२३ चा आज शेवटचा दिवस आणि उद्याची सकाळ असणार आहे नवीन वर्षाची. सकाळ असेल रोजच्यासारखीच ! पण आठवड्याची सुरुवात ज्या वाराने होते, तो सोमवार म्हणजे आठवड्याचा पहिला दिवस असेल आणि २०२४ ची नवीन कोरी करकरीत सकाळ आपल्या स्वागतासाठी सज्ज असेल. या प्रसंगी मला कविवर्य भा. रा. तांबे यांची ' मावळत्या दिनकरा ' ही कविता आठवते आहे. उगवत्या सूर्याला वंदन करणारे आणि मावळत्या सूर्याकडे पाठ फिरवणारे हे जग ! पण ज्या मावळत्या सूर्याने मला आजचा दिवस दिला, त्याच्याबद्दल मी कृतज्ञ राहायला नको का ? माझा उद्या हा आजच्या पायावरच उभा असणार आहे. कविवर्य तांबे जसे मावळत्या दिनकराला वंदन करतात, तसे मीही मावळत्या वर्षाला करतो. कारण २०२३ च्या पायावरच २०२४ उभे असणार आहे. २०२३ ने मला आणि तुम्हाला खूप काही दिले आहे. आर्थिक वर्ष संपत आलं की बँका, वित्तीय संस्था, करसल्लागार त्या त्या वर्षाचा हिशेब मांडतात. जमा बाजू, खर्चाची बाजू, हातात राहिलेली शिल्लक वगैरे. त्या आर्थिक वर्षात निव्वळ नफा किती झाला याचाही हिशेब केला जातो. तसंच आपल्या आयुष्यातलं जाणारं वर्ष आपल्याला काय देऊन गेलं आणि आपल्याकडून काय घेऊन गेलं याचाही हिशेब आपण मांडायला हवा. मला जो हिशेब या ठिकाणी अपेक्षित आहे तो हिशेब फक्त पैशांचा नाही. २०२३ च्या आधीची वर्षे कोरोनाचा भयंकर अनुभव देऊन गेली. आपण सगळे भाग्यवान आहोत की कोरोनाच्या भयंकर काळातही आपण जगलो, वाचलो आणि आता तर नव्या वर्षाला सामोरे जात आहोत.




## आनंदी पहाट




## ध्यानाचे फायदे ध्यानात घ्यावेत

आधुनिक केसरी

अनेकदा आत्म-जागरूकता आणि करुणेचा मार्ग म्हणून ध्यानाचा विचार केला जातो, हा देखील चांगल्या आरोग्याचा मार्ग असू शकतो. हिंदू, बौद्ध, झेन/चान आणि ताओवादी समुदायांमध्ये हजारो वर्षांपासून सरावलेले लोक आज व्यस्त जगात तणाव आणि काळजीचा सामना करण्यासाठी ध्यानाचा वापर करतात. जे लोक सहसा चिंताग्रस्त वाटतात त्यांना शांतता आणि अंतर्दृष्टी आणण्यास हे मदत करू शकते. ध्यान म्हणजे कठीण परिस्थितीतही लक्ष, भावनिक जागरूकता, दयाळूपणा, सहानुभूती, सहानुभूतीपूर्ण आनंद आणि मानसिक शांतता वाढवण्यासाठी तंत्रांचा संच होय. काही व्यक्तींना असे आढळून येते, की नियमित ध्यान सराव त्यांना स्वतःशी दयाळू आणि इतरांबद्दल अधिक काळजी घेण्यास मदत करते. जेव्हा कठीण परिस्थिती उद्भवते तेव्हा ते आपल्याला थोडे कमी प्रतिक्रियाशील होण्यास देखील शिकवू शकते. ध्यान केल्याने तणाव कमी होऊ शकतो. नियमित ध्यानाद्वारे चांगले लक्ष केंद्रित केल्याने स्मरणशक्ती आणि मानसिक स्पष्टता वाढू शकते. हे फायदे वय-संबंधित स्मरणशक्ती कमी होणे आणि स्मृतिभ्रंश यांच्याशी लढण्यास मदत करू शकतात. ध्यान केल्याने लक्ष वाढण्यास मदत होते, ज्यामुळे आपण जास्त काळ लक्ष केंद्रित करू शकतो. निरुपयोगी सवयी टाळण्यासाठी आवश्यक असलेली मानसिक शिस्त ध्यानामुळे विकसित होते. ध्यान केल्याने झोप येण्यासाठी लागणारा वेळ कमी होतो आणि झोपेची गुणवत्ता सुधारते. ध्यान केल्याने वेदना कमी होतात आणि भावनांचे नियमन वाढू शकते. ध्यानादरम्यान आणि नियमितपणे ध्यान करणाऱ्या लोकांमध्ये रक्तदाब कमी होतो. यामुळे हृदय आणि रक्तवाहिन्यांवरील ताण कमी होतो आणि हृदयविकार टाळण्यास मदत होते. नियमित ध्यान केल्याने चिंता कमी होण्यास मदत होते. ध्यानामुळे नैराश्य कमी होण्यास मदत होते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655




आधुनिक केसरी

### पिंपळ सोन्याचा | सळाळतो ||

भक्ती नी वैराग्य | प्रसवते जेव्हा ||
ज्ञानयोगी तेव्हा | जन्म घेतो ||१||
स्थितप्रज्ञा अंगी | कारूण्य उमाळा ||
आनंदी सोहळा | यातनांचा ||२||
सद्गुरू कृपेने | प्रज्ञा फळा आली ||
विश्वाची माऊली | ज्ञानराजा ||३||
करूनिया कर्म | उध्दरीले जना ||
माऊलींचा पान्हा | वागयज्ञ ||४||
लाभता विसावा | अजान वृक्षाचा ||
पिंपळ सोन्याचा | सळाळतो ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

आजी जरी ते असती ।तरी मजला कदा न विशंभती ।
वियोग होतां आक्रंदती ।ते पोटागि वेगळीच ॥३६॥
पुत्र वैभवहीन भिकारी ।माता तैसाचि अंगिकारी ।
दगदला देखोन अंतरीं ।त्याच्या दुःखें दुःखवे ॥३७॥
प्रपंच विचारें पाहातां ।हें सकळ जोडे न जोडे माता ।
हें शरीर जये करितां ।निर्माण जालें ॥३८॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

केतो हठ बाहर करो,
मल अन्तर नहिं जाय ।
ज्यों बॉंबी विषधर बसै, मारे चोट न पाय ।।१२५।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/१२५

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : बाहेरून किंवा वरवर कितीही बलपूर्वक प्रयत्न केला तरीही आंतरिक दोष, विकार दूर होऊ शकत नाही. ज्याप्रमाणे साप बिळात आहे आणि त्याला वरून प्रहार केला तर लागत नाही. त्याचप्रमाणे अंतःकरणात जर दुर्गुण असतील तर बाहेरील म्हणजेच शारीरिक प्रक्रियेद्वारे ते दूर होऊ शकत नाहीत. ते दूर करण्यासाठी उपयुक्त आंतरिक साधना अंगीकारली पाहिजे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## स्वागत २०२४

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आयुष्यात तुमच्या सारखी माणसं मला मिळाली हे मी माझे भाग्य समजते. माणसं जोडणं मला फार आवडते किंबहूना आपल्या सारखी माणसं मिळणे हे मी माझा बॅंक बॅलन्स समजते. सुंदर फुलांची जशी मनमोहक माळ तयार होते, तशीच सुंदर विचारांची माणसे सुध्दा सुंदर असतात. प्रेमळ, माणुसकी जपणारी दिव्यानेच दिवा लावायचा असतो, तशीच आपल्या सारख्या प्रेमळ माणसांची माणुसकीची माळ पण तयार होते,आपण माझ्यासाठी माळेतील एक फुल आहात,अनमोल आहात. २०२३ मध्ये माझ्या कडून काही चूक झाल्यास क्षमस्व प्रेमळ नात्याच्या मैत्रीमध्ये मनापासून धन्यवाद मैत्रीच्या नात्याची साथ यापुढे ही अशीच कायम असू द्या नव्या वर्षात नव्या उमेदीने पून्हा असेच ऋणानुबंध जपू या स्नेहवंदन स्नेहवंदन.

## नाम हे चिरंतन आहे, त्याला समाप्ती नाही

आधुनिक केसरी

खरे पाहिले म्हणजे आपण जपाची जी समाप्ती करतो ती केवळ अज्ञानामुळेच; कारण नाम हे चिरंतन आणि काळापलीकडचे आहे. त्याचे माहात्म्य कळायला फार कठीण आहे. देवाला अत्यंत प्रिय जर काही असेल तर ते म्हणजे त्याचे नाम. ते घेतल्याने तो आपलासा होईल. देव नामाशिवाय राहू शकत नाही. त्रिवेणीसंगम जर कोणता असेल तर तो म्हणजे देव, भक्त आणि नाम. जिथे देव असेल तिथे भक्त आणि नाम असते; आणि जिथे भक्त असतो तिथे नाम आणि देव असतो. तुम्ही लोकांनी सेवा फार केली. खरोखर, जपाची सांगता करून तुम्ही राजाला लाजवील अशा रीतीने उत्सव साजरा केलात. आता रामाजवळ असे काही मागा की पुन्हा काही हवेसे वाटणार नाही. आपण जर काही अगदीच क्षुल्लक मागितले तर तो हसेल, की मी एवढा दाता असताना हे क्षुल्लक काय मागतात ! तर आता त्याच्याजवळ, ' देवा, माझे समाधान निरंतर टिकू दे, आणि तुझ्या नामाचे प्रेम दे, ' हेच मागणे मागा. भगवंताला पूर्ण शरण जाऊन सांगा, " भगवंता, मी हा असा आहे,



यात सुधारणा होणे माझ्या हाती नाही. रामा, मी तुझे नाम मरणापर्यंत घेईन तरच जगेन. " स्त्रियांनी एकच करावे, पति देवासमान मानून देहाने त्याचे व्हावे आणि मनाने देवाचे व्हावे. प्रपंच हा परमार्थाचा लाभ होण्यासाठी करावा. कुठेही गुंतून राहू नये, कोणत्याही उपाधीत सापडू नये. उपाधीरहित राहाण्याचे साधन म्हणजे उपाधीरहित असलेले भगवंताचे नाम सतत घेणे. नाम घेतल्याने श्रद्धा दृढ होईल आणि नामाची गोडी लागेल. जसे पाणी गोठल्यावर बर्फ होतो, त्याचप्रमाणे नाम घेतल्याने श्रद्धा घट्ट होते. श्रद्धेमुळे देवाला तुम्हांला भेटावेच लागेल. तुम्ही अखंड नाम घेत राहा, देव तुम्हांला खात्रीने भेटेल याबद्दल शंका बाळगू नका. परमार्थ आणि व्यवहार यांची उत्तम सांगड घालावी. परमार्थाबद्दल नसत्या शंका घेऊ नयेत. आजच्या या दिवसापासून, आपण आपल्या मुलाला जितक्या आपलेपणाने हाक मारतो, तितक्या आपलेपणाने देवाला हाक मारा; आणि आतापर्यंत जितक्या आवडीने भगवंताचे नाम घेतलेत तितक्याच किंवा त्याच्याहीपेक्षा जास्त आवडीने आणि निष्ठेने ते घ्या. अंतकाळी अगदी सगळ्यात शेवटी सुटणारी वस्तू म्हणजे भगवंताचे नाम पाहिजे; नामात शेवटचा श्वास गेला पाहिजे. नाम इतके खोल गेले पाहिजे की प्राणाबरोबरच ते बाहेर पडावे. असे नाम जो घेतो त्याला देहाच्या सुख-दुःखाची जाणीवच राहणार नाही. तो आनंदात राहील. मला खात्री आहे, राम त्याचे कल्याण करील. **३६६. नामात शेवटचा श्वास जाण्याकरिता आतापासून सतत नामात राहण्याचा प्रयत्न करा.**

## गहिनीनाथ

आधुनिक केसरी

त्या गाडीवर बसावयासाठी एक गाडीवान असावा असे त्या मुलांच्या मनात येऊन ती चिखलाचा पुतळा करू लागली, परंतु त्यांना साधेना, म्हणून ती एक मातीचा पुतळा करून देण्याविषयी गोरक्षनाथाची प्रार्थना करू लागली. त्याने त्यांची ती विनवणी कबूल केली व चिखल घेऊन पुतळा करावयास आरंभ केला. गोरक्षनाथ जो चिखलाचा पुतळा करील त्यापासून गहिनीनाथाचा अवतार व्हावयाचा, वगैरे संकेत पूर्वी ठरलेला होता. त्या अन्वये त्यास पुतळा करून देण्याची बुद्धि उत्पन्न झाली. नवनारायणांपैकी करभंजन हा अवतार ह्या मातीच्या पुतळ्यापासून व्हावयाचा, म्हणून गोरक्षास तशी बुद्धि होऊन त्याने पुतळा करावयास घेतला. त्या वेळी मुखाने संजीवनी मंत्राचा पाठ चालला होता. संपूर्ण पुतळा तयार झाला अशी संधि पाहून करभंजनाने त्यात प्रवेश केला.



आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक




# सोशल मीडियाच्या जमान्यात शुभेच्छापत्र झाले हद्दपार

आधुनिक केसरी न्यूज

**अतुल वेताळ**

**सुलतानपूर :** नववर्षाच्या स्वागतासाठी प्रत्येकजण तयार आहे. याचवेळी नववर्षाच्या, दिवाळी च्या स्वागताला प्रियजनांना दिले जाणारे शुभेच्छापत्र मात्र काळाच्या ओघात बाद झाले आहेत. याची जागा आता मोबाइलवरील मेसेजने घेतली आहे. यामुळे शुभेच्छापत्र विक्रेत्यांवर संक्रांत ओढवली आहे. सिजनेबल दुकान लावणाऱ्या विक्रेत्यांना याचा मोठा फटका बसला आहे. पूर्वी दीपावली, नाताळ व नववर्षाच्या स्वागतासाठी प्रत्येक पुस्तकालयात शुभेच्छापत्रांची रेलचेल राहत होती. आठ दिवस आधीपासूनच असे शुभेच्छापत्र प्रियजनांना पाठविण्यासाठी विशेष तयारी केली जात होती. डाक विभागाकडून यासाठी कुरिअरमधूनही असे शुभेच्छापत्र शाळेतील मित्र-मैत्रिणींना नववर्षाच्या शुभेच्छा देण्यासाठी पूर्वी ग्रीटिंग कार्ड देण्याची परंपरा होती. वेगवेगळे सुविचार, आवडते कलाकार, खेळाडू, नैसर्गिक चित्र असलेले ग्रीटिंग कार्ड मित्रांना दिल्यानंतर मैत्री घट्ट होत असे ग्रीटिंग कार्ड देण्यात आणि घेण्यात वेगळाच आनंद होता.. आज तो आनंद सोशल मीडियामुळे लोप पावला आहे.




नातलगांना, शुभेच्छा मित्रपरिवाराला कार्ड देऊन त्यातून भावना व्यक्त केल्या जात होत्या. आता मात्र सोशल मीडियावर इमोजीचा भडीमार दिसतो. आठ-दहा वर्षापासून सोशल मीडियाद्वारेच नववर्षाचे संदेश पाठविले जातात. भेटकार्डाच्या माध्यमातून मराठी भाषा संवर्धन, कविता, सण, संस्कृतीची जपणूक, दरवर्षी नवा विचार दिला जात होता. आता सोशल मीडियाच्या नव्या फिचरमुळे सेकंदात एकाच वेळी अनेकांना मेसेज पाठविता येतात. या दिवसाचे महत्त्व जाणून सिजनेबल दुकानदारांची काही दुकाने या काळात पाहायला मिळत होते. काळानुसार साधे शुभेच्छापत्र रंगीत झाले. आता तर हे कार्डच मोबाइलवर आले. त्यात अँड्रॉइड मोबाइलने शुभेच्छापत्रांची रंगतच काढून घेतली आहे. पाहिजे तसे आणि पाहिजे तेव्हा शुभेच्छापत्र मिळविण्यासाठी गुगलकडून मदत होते. तर काही नवीन ॲप ही आले आहेत. यामुळे अशा पद्धतीचे शुभेच्छापत्र मिळविण्यावर ग्राहकांचा भर राहिला आहे. यामुळे शुभेच्छा कार्ड घेण्याकडे सर्वांनी पाठ फिरविली आहे. अशा प्रकारचे



शुभेच्छापत्र निर्माण करण्याचे काम शुभेच्छापत्र कंपनीने थांबविले आहे. याचा परिणाम बाजारात पाहायला मिळत आहे.






# अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे जेलभरो आंदोलन

## मानधन नको; वेतन हवे

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाच्या वतीने आज वाशिम येथे सरकार विरोधात निषेध मोर्चा काढण्यात आला आहे. मानधन नको; वेतन हवे अशा विविध मागण्या संदर्भात आज दि.३ जानेवारी रोजी जेलभरो आंदोलन करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने रिसोड तालुक्यातील सर्व अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी सुद्धा सदर मोर्चात सहभाग घेतला आहे. सरकार विरोधात निषेध व्यक्त करत, जिल्हाभरातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषद कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले आहे.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आज दि.३जानेवारी रोजी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संयुक्त संघटना संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली जिल्हयातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी ठीय्या आंदोलन केले आहे. शासन त्यांच्या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या सर्व प्रलंबित





असलेल्या मागण्या सरकारने लवकरात लवकर सोडवाव्यात यासाठी आजचे आंदोलन करण्यात आले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्याअनुषंगाने जिल्हाभरातील अंगणवाडी सेविका व मदतनीस या मोर्चात सहभागी झाल्या आहेत. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना योजनेच्या कामा व्यतिरिक्त इतर अनेक कामे लादली जातात, मात्र या कामांसाठी कर्मचाऱ्यांनी दिलेल्या वेळेचे मूल्यमापन शासनाकडून केले जात नाही. यासंदर्भात कर्मचाऱ्यांना ८तास पुर्ण वेळ काम देऊन कामगार कायद्याप्रमाणे त्यांना वेतनश्रेणी लागू करावी व शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा. शासनाच्या समान किमान कार्यक्रमानुसार अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनात भरघोस वाढ करून, किमान वेतन कायद्यानुसार दरमहा १८ हजार ते २५ हजारापर्यंत किमानवेतन देण्यात यावे. तद्वतच सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार ग्रॅच्यूइटिचे नियम तयार करण्यात यावेत, अंगणवाडी कर्मचाऱ्यांची रिक्त पदे ३ते४ वर्षांपासून भरली नसल्याने एका कर्मचाऱ्यालाच दोन्ही कामे करावी लागतात त्यासाठी कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत.१० वी पास मदतनीसांना सेविका पदी थेट नियुक्ती देण्यात यावी, सन २००२ च्या शासन निर्णयानुसार सेविकांमधून मुख्यसेविकेची नियुक्ती करण्यात यावी, शिवाय करोना काळात अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी जीव तळहातावर घेवून शासनाच्या आदेशाप्रमाणे कामे केली आहेत. त्यासाठी केंद्र शासनाने जाहीर केलेला प्रोहत्सान भत्ता अनेक महिने काम करूनही आजतागायत मिळाला नाही. त्यानुसार अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ५००० रुपये प्रमाणे प्रोत्साहनपर भत्ता देण्यात यावा, तसेच बदलत्या काळानुसार सर्व कर्मचाऱ्यांना अद्यावत नवीन मोबाईल देण्यात यावे. आदी व ईतर अनेक मागण्यासंदर्भात जिल्हयातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी आज ठिय्या आंदोलन केले आहे.

# ताजणापूर ते किनगाव फाटा रस्त्याची दुरावस्था

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** बाजार सावंगी ते किनगाव फाटा हा मुख्य रस्ता असुन बाजार सावंगी हे तिस ते पस्तीस खेडे लागून असलेले मुख्य बाजारपेठेचे गाव असल्याने तेथे सतत मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते, मोठा आठवडे बाजार, भव्य बाजारपेठ, शाळा, कॉलेज, दवाखाने, आदि अनेक सुविधा असलेले गाव असूनही रस्ता मात्र एखाद्या डोंगराळ, मागासलेल्या खेडे गावासारखा आहे.ताजनापुर फाटा ते किनगाव फाटा दरम्यान रस्त्याची दुरवस्था झाली असून जागोजागी खड्डे पडले आहेत किनगाव फाटा पासून बाजार सावंगी अंतर सात किलोमीटर असून गेल्या कित्येक वर्षांपासून किनगाव फाटा ते बाजार सावंगी हा रस्ता सतत चर्चेत आहे या रस्त्याचे काम व्हावे यासाठी अनेक वेळा विविध प्रकारचे आंदोलने झाली ज्यात उपोषण असेल रास्ता रोको असेल विविध प्रकारे या रस्त्याचे काम व्हावे यासाठी मागणी करण्यात आली कित्येक वर्ष म्हणजे दहा वर्षापेक्षा जास्त दिवस मागणी केल्यानंतर काही दिवसांपूर्वी काही प्रमाणात बाजार सावंगी पासून ते ताजनापुर फाटा दरम्यान हा तीन किलोमीटर रस्ता दोन टप्प्यात करण्यात आला मात्र तोही निकृष्ट दर्जाचा थातूरमातूर आत्ताच दीड वर्षात या रस्त्याला जागोजागी खड्डे पडले आहेत फक्त सात किलोमीटर अंतर हा पूर्णपणे रस्त्याचे काम न करता तीन किलोमीटर रस्त्याचे काम दोन टप्प्यात करण्यात आलं आणि आता अजूनही चार किलोमीटर रस्त्याचे काम करणे गरजेचे असून त्याला जागोजागी खड्डे पडले त्याची कित्येक वेळा खड्ड्यांमध्ये डांबर खडी टाकून डागडुजी करण्यात आली.

# खऱ्या कोरोना योद्ध्यांचा सिव्हिल हॉस्पिटल येथे भरतीत समावेश करा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हॉस्पिटल येथे होणाऱ्या सरळ सेवा भरतीत कोरोना काळात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना समाविष्ट करा जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रात करोना काळ हा खूप भयंकर होता त्याचप्रमाणे त्याचा प्रकोप धुळे जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात होता अशा वेळेस धुळे शहरातील भाऊसाहेब हिरे हॉस्पिटल येथे कंत्राटी कर्मचारी भरण्यात येत होते परंतु अशा भयानक महामारीत कोणीच काम करायला तयार नव्हते परंतु अशा वेळेस जीवाची परवा न करता कोरोना योद्धा म्हणून येथे रुजू होते . रुग्णाचे डायपर चेंज करण्यापासून ते त्याची पूर्ण देखभाल डॉक्टरांच्या खांद्याला खांदा लावून काम केले. व संपूर्ण महाराष्ट्रात कोरोना मुक्त धुळे जिल्हा हा प्रथम आला. परंतु आज ज्या कोरोना योद्धांमुळे धुळे जिल्हा प्रथम आला व आमची अवस्था खूप बिकट आहे कोरोना संपल्यापासून आम्हाला कामावरून काढण्यात आले असे या निवेदनाद्वारे सांगण्यात आले आम्ही अनेकदा पालकमंत्री, जिल्हाधिकारी, पालिका आयुक्त, आमदार, ग्रामीण आमदार, नगरसेवक, व तुमच्या गटाचे कार्यकर्ते यांना शेकडो निवेदन देऊनही आमची कुठलीही दखल घेतली नाही असा आरोप देखील करण्यात आला. आमची मागणी फक्त भाऊसाहेब हिरे वैद्यकीय हॉस्पिटल येथे आम्हाला कामावर कायम रुजू करून घ्या एवढीच आहे भाऊसाहेब हिरे हॉस्पिटल येथे कर्मचारी नसल्याने अवस्था खूप बिकट आहे. आम्हाला कामाचा मोठा अनुभव असल्यामुळे या भरतीत किंवा किंवा सरळ सेवेत सामावून घ्या असे या निवेदनात सांगण्यात आले.



# असाही आदर्श

आधुनिक केसरी

२२ जानेवारी या दिवशी अयोध्येतील राम मंदिरात रामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राम मंदिरात रामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. या सगळ्या महोत्सवाची तयारी देशभरात सुरु आहे. अशात एका राज्याने २२ जानेवारी या दिवशी ड्राय डे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे सोशल मीडियावर चांगलेच कौतुक होते आहे. छत्तीसगड या राज्याने २२ जानेवारीच्या दिवशी म्हणजेच रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा होणार आहे त्या दिवशी ड्राय डे जाहीर केला आहे. मुख्यमंत्री विष्णु देव साय यांनी या दिवसाची घोषणा केली आहे. तसंच २५ डिसेंबर ते २ जानेवारी या कालावधीत आम्ही सुशासन सप्ताह ठेवला होता, असेही त्यांनी सांगितले. त्याचवेळी त्यांनी २२ जानेवारी रोजी ड्राय डे असेल अशी घोषणा केली. आमचा राज्य चालवण्याचा आदर्श रामराज्य आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री विष्णुदेव साई यांनी सांगितले की तांदूळ उत्पादक संघटनांकडून ३ हजार टन तांदूळ अयोध्येला पाटवला आहे. तसंच २२ जानेवारीच्या दिवशी संपूर्ण देशात उत्साहाचे वातावरण असणार आहे दिवाळीसारखे वातावरण असेल, राज्यातल्या जनतेनेही दिवाळी साजरी करावी असंही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. तसेच २२ जानेवारी या दिवशी राम मंदिरात प्राण प्रतिष्ठा होणार आहे. त्यावेळी राज्यात ड्राय डे घोषित करण्यात आला आहे. छत्तीसगडमध्ये प्रभू रामचंद्रांचे आजोबा राहून गेले आहेत. आम्ही त्यासाठी स्वतःला भाग्यवान समजतो असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

# बाबासाहेबांच्या लेकरांनो, सावध भूमिका घ्या !



हेमंत टाले
संपर्क क्र. 9975807632


आधुनिक केसरी

**सस्नेह जयगुरु, जय भीम मित्रांनो, वज्रधारीचे संपादक माझे सहकारी मित्र निडर पत्रकार वारकरी संतांच्या प्रबोधन परंपरेवर विश्वास असणारे शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचाराचे वारसदार दत्तकुमार खंडागळे यांनी लिहिलेले मी संभाजी भिडेच्या तावडीतून कसा सुटलो ? हे पुस्तक भीमा कोरेगाव येथे शौर्य दिनाच्या निमित्ताने विक्रीसाठी आणले असताना सदर पुस्तकावरील मनोहर कुलकर्णी उर्फ संभाजी भिडे यांचा फोटो पाहून काही आंबेडकरी विचाराच्या तरुणांमधे गैरसमज निर्माण झाला.**

हे पुस्तक म्हणजे जणू काही संभाजी भिडेचं उदात्तीकरण करणारच पुस्तक आहे असं त्यांना वाटलं आणि संभाजी भिडेचं हे पुस्तक कशाला आणलं असा सवाल करत बाराशे पुस्तकाच्या प्रति फाडून त्याचे अक्षरशः तुकडे तुकडे केले. मी लेखकाशी भ्रमणध्वनीवरून संपर्क केला असता त्यांनी त्यांची भूमिका मांडली की, संभाजी भिडे यांच्या शिवप्रतिष्ठांनने हे पुस्तक फाडले असते तर मला काही वाटलं नसतं, परंतु बाबासाहेबांवर प्रेम करणारे आंबेडकरी तरुण हे पुस्तक फाडतील असा विचार मी कधीही केला नव्हता. प्रबोधनाच्या परंपरेवर माझा विश्वास आहे. जीवावर उदार होऊन मी हे पुस्तक लिहिलं आणि कर्ज काढून ते छापलं आहे. गैरसमजातून हा प्रकार घडला. आंबेडकरी विचाराच्या तरुणांविषयी माझ्या मनात कुठेही राग नाही. त्यांनी माझी भूमिका समजून घ्यावी असे विचार लेखकांनी व्यक्त केले. एखाद्या लेखकाचा स्टॉल संपूर्णपणे उध्वस्त होणं, त्याचं पुस्तक फाडल्या जाणं ही बाब किती वेदनादायी असू शकते हे लेखक म्हणून मी समजू शकतो. माझी विनंती आहे की,आंबेडकरी चळवळीतील तरुणांनी आणि संपूर्ण वाचकांनी दुप्पट किमतीने त्यांची पुस्तकं विकत घेऊन लेखकांची नुकसान भरपाई करून द्यावी. मी आशादायी आहे.

घडलेला प्रकार हा अत्यंत वेदनादायी असून माझ्यासारख्या गुरुदेव चळवळीतून आलेल्या आणि बाबासाहेबांवर प्रेम करणाऱ्या आंबेडकरी चळवळीतील कोणत्याही व्यक्तींना रुचणारा आणि पचणारा नसून क्षणभर विचार करायला लावणारा आहे. दत्तकुमार खंडागळे हे शिवप्रतिष्ठांचे सुरुवातीचे कार्यकर्ते राहिलेले आहेत. त्यामुळे छत्रपती शिवरायांचे नाव असणारी ही संघटना म्हणून आम्ही या संघटनेमध्ये सामील झालो. परंतु संभाजी भिडे नावाच्या विकृत माणसाने आमच्या मनामध्ये शिवरायांच्या निमित्याने मुस्लिम द्वेष इतका ठासून भरला की मुसलमान दिसला की याला तलवारीने कापूनच काढलं पाहिजे इथपर्यंत आमचे मन कलुषित करण्यात आले होते. शिव प्रतिष्ठान मध्ये प्रश्न विचारायला बंदी आहे. त्यांना फक्त होय बा म्हणणारे कार्यकर्तेच हवे असतात. संभाजी भिडे हा विचार प्रक्रियाच थांबवणारा माणूस आहे. हे लक्षात आल्यानंतर आम्ही सावधपणे भूमिका घेतली आणि शिवप्रतिष्ठानला रामराम ठोकला. मी संभाजी भिडेच्या तावडीतून कसा सुटलो ? हे पुस्तक म्हणजे दत्तकुमार खंडागळे यांची आत्मकथाच म्हणावी लागेल.

कुठलीही संघटना असो मग ती शिवप्रतिष्ठान का असेना ही चळवळ कशा पद्धतीने काम करते.संभाजी भिडे हा हजारो बहुजनांच्या तरुण मुलांना कसा आपल्या भजनी लावतो, शिवाजी महाराजांच्या नावाने कशा पद्धतीने मुस्लिम द्वेष



पसरवतो आणि अगदी १५,१६ वर्ष संवेदनशील वयाच्या मुलांना जे वैचारिकदृष्ट्या अपरिपक्व असतात ज्यांचं वय हे विचार न करता बेधडकपणे निर्णय घेणार असं संवेदनशील वय आहे अशा मुलांना कशा पद्धतीने आकर्षित करतो आणि दंगली घडवून त्यांचं संपूर्ण करिअर कसं बरबाद करतो.या संघटनेची कार्यपद्धती कशी आहे हे जर आपल्याला जाणून घ्यायचं असेल तर दत्तकुमार खंडागळेनी लिहिलेलं हे पुस्तक आपण सर्वप्रथम वाचलं पाहिजे असं मला वाटते.

बाबासाहेबांनी मनुस्मृती जाळली पण ती वाचून जाळली कारण मनू नावाच्या गटारातून बाहेर निघालेली ती घाण होती. समस्त बहुजन समाजाला दोन हजार वर्ष अज्ञानाच्या अंधकारात खितपत ठेवणारी आणि कधी न संपणारी ती काळोखी रात्र होती. ती रात्र ज्यांना आम्ही ज्ञानाचं प्रतीक मानतो त्या बाबासाहेबांनी घालवली आणि प्रकाशाच्या नव्या वाटा आम्हाला उपलब्ध करून दिल्या. त्या वाटेने आजचा बहुजन समाज निर्भीडपणे चालतो आहे. हे चित्र खरोखरच आशादायी आहे आणि तितकच मंगलदायी आहे. संभाजी भिडे हा मनुस्मृतीच्या गटारगंगेतील किडा आहे. त्यासाठी एकच उदाहरण तुमच्या पुढ्यात ठेवतो. ज्या महात्मा फुलेंनी मनूच्या ब्राह्मणी पाशातून मुक्त करण्यासाठी इथल्या बहुजन समाजासाठी आणि विशेष म्हणजे आमच्या लेकी सुनांसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडले त्या क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांना हा भिड्या भडव्याच्या यादीतील सुधारक म्हणतो. त्यामुळे दत्तकुमार खंडागळे यांनी लिहिलेल्या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरिल संभाजी भिडे सारखी घाण दिसल्यानंतर त्यावर थुंकावं असं वाटणं स्वाभाविक आहे. हो चीढ झुठी राह की,अन्याय की अभिमान की राष्ट्रसंताच्या वरील ओळीनुसार आमच्या महापुरुषांचा अपमान करणाऱ्या आमच्या महापुरुषांना जाहीरपणे वाकोल्या दाखवणाऱ्या संभाजी भिडे सारख्या नालायक माणसाविषयी चीड निर्माण होणे हे स्वाभाविक आहे. परंतु ज्यांनी रक्ताचा एकही थेंब न सांडवता इथल्या बहुजन समाजाला गुलामीतून मुक्त केलं त्या क्रांतिकारी महापुरुषांच्या अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाच्या विचाराचे आपण वारसदार आहोत याचं भान आंबेडकरी चळवळीतील प्रत्येक तरुणाने ठेवलं पाहिजे असं मला वाटते. वैचारिकदृष्ट्या अतिशय समृद्ध असा वारसा आपल्याला लाभलेला आहे. परंतु संभाजी भिडे ज्या सांस्कृतिक प्रवाहाचा वारसदार आहे जगात त्यांना कोणीही ओळखत नाही. ही त्यांची मजबुरी आहे. आणि म्हणून महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जरी गुरुजींच्या पायावर आपला मस्तक ठेवत असले तरी भिडे यांची भाषा ते बोलू शकत नाही. नाईलाजाने का असेना त्यांना ज्योतिबांना शरण जावं लागतं ही त्यांची मजबुरी आहे. अशा पंचांगी लोकांचा आणि प्रचंड वैचारिक दारिद्र्य असणारा हा सांस्कृतिक प्रवाह आहे. अशा वैदिक पंचांगी पोंगा पंडितांचे बुर्खे फाडण्यासाठी आपल्याकडे भगवान बुद्ध आहे,भगवान महावीर आहे,ज्यांनी लिंगायत पंथाची स्थापना केली आणि इथल्या वैदिकांना आव्हान दिले अशे समतावादी महात्मा बसवेश्वर आपल्याकडे आहे. आपल्याकडे संत कबीर आहे. आणि आपल्याकडे आहे वारकरी संप्रदायाच्या संतांची समतावादी परंपरा. आपल्याकडे कर्मयोगी संत गाडगेबाबा आहेत आणी आपल्याकडे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांसारखे संत महापुरुष आहे. आपल्या महापुरुषांच्या साहित्यातील शब्दरुपी शस्त्राने संभाजी भिडे यांच्या विचाराच्या चिंध्या, चिंध्या करणाऱ्या साहित्याची निर्मिती करणारे लेखक वक्ते आणि विचारवंत निर्माण व्हावे आणि संभाजी भिडेचं पुस्तक फाडल्यापेक्षा संभाजी भिडे च्या विचारायच्या ठिकऱ्या ठिकऱ्या करणं ही आंबेडकरी चळवळीची दिशा असली पाहिजे. भीमा कोरेगाव येथे दत्तकुमार खंडागळे यांनी विनंती केली की, किमान माझ्या पुस्तकाचा पहिला उतारा तरी वाचा. माझी भूमिका समजून घ्या. त्यांची विनंती ऐकून जर आंबेडकरी चळवळीतील तरुणांनी त्याच्या पुस्तकाचा पहिला उतारा जरी वाचला असता तर हा अनर्थ टळला असता. त्यामुळे समस्त बाबासाहेबांच्या लेकरांना आंबेडकरी तरुणांना आणि परिवर्तनवादी विचाराच्या सर्व चळवळीतील साबुत मेंदूच्या सळसळत्या रक्ताच्या बांधवांना माझी विनंती आहे की आपण सावधपणे भूमिका घेतली पाहिजे. रात्र वैऱ्याची आहे.

# सत्यरूप दर्शनासाठी मूल्यमापनाचे ज्ञान असले पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**शब्दा मागिल भाव आणि स्तुती कौतुक निंदा यामागे असणार स्वारस्य समजणं म्हणजे योग्य पद्धतीने मूल्यमापन करता येणं. एखादयाच नेमकं वास्तव स्वरूप काय आहे हे उशीर लक्षात आलं तर अतोनात नुकसान होत.म्हणून बाब विषय कोणतीही असो त्याचं मूल्यमापन करण्याचं ज्ञान योग्य वेळी समजलं पाहिजे.सगळ्यांचं क्षेत्रात असलीच्या नावाखाली नकलीचा धुमाकूळ जोरदार सूरू आहे पण ज्याला मूल्यमापन करण्याचं योग्य ज्ञान आहे त्याला नकली भुरळ घालू शकत नाही म्हणून जीवन हितार्थ असली सत्य काय आहे आणि नकली खोट काय आहे हे योग्य वेळी समजणं खूप गरजेच आहे.नकली हे चमकदार असल्याने त्याचा सगळीकडेच प्रचंड धुमाकूळ असून मूल्यमापन करण्याचं ज्ञान अवगत असले तर नकली निष्प्रभ ठरत.**

मूल्यमापन कळत नाही म्हणून आपण कोणाला काय समजतो हेच आपल्याला प्रथम कळतं नाही म्हणून फसगत होते. ज्याला योग्य मूल्यमापन समजलं तो योग्य आणि अयोग्य यामधील फरक क्षणात ओळखतो.मूल्यमापन समजलं नाही अथवा चुकलं तर चमक हि भुरळ पाडणारच या मध्ये शंका नाही.चमक पाहून लोक अक्षरशः भुलतात हे वास्तव असलं तरी देखील ज्याला मूल्यमापन समजलं तो भूलत नाही हे तितकेच खर आहे म्हणून मूल्यमापन समजलं पाहिजे.काही वस्तू दिसायला सारख्या असतात पण मूल्य वेगळं असतं तसंच सगळी माणसं बाहेरून दिसायला सारखीच दिसत असली तरी देखील अंतरयामी वेगवेगळी असतात.आपल्या संपर्कात येणारे वेगवेगळ्या प्रकारचे व्यक्ती यांची पारख आपण कशी करतो यावरच बरंच काही अवलंबून असतं. मूल्यमापन समजलं तर फसगत होत नाही पण नाही समजलं तर मग मात्र नुकसान होण निश्चित असत.योग्य वेळी योग्य अयोग्य काय आहे हे समजलं पाहिजे.मूल्यमापन करण्याचं समजलं नाही तर आपली अधोगती,अपकिर्ती,अहित हानी तर होण्याची शक्यता असतेच. त्यासोबतच, दुःख, वेदना हे देखील वाट्याला येतात.मुल्यमापन चुकता कामा नये दिसत तसं नसतं.हा नैसर्गिक सिद्धांत आहे. आपण कशाला काय समाजावे हे सर्वस्वी आपल्या स्वतःच्या विवेक बुद्धी वर अवलंबून असते. जबरदस्तीने अथवा बळा वापरून कोणीही आपल्यावर प्रभाव निर्माण करत नाही आपली बुद्धी चमक पाहून भूलते पण आपण हे मान्य करत नाहीत करणार नाहीत.आपण आपल्या विवेका नुसारच तात्कालीन परिस्थिती पाहून मित्र शत्रू निश्चित करतो.काही कालावधी नंतर मात्र या मध्ये बदल होऊन मित्राचा शत्रु व शत्रु चा मित्र होऊ शकतो.मग असं काय घडलं कि हा बदल झाला तर असं काहीच घडलेल नसतं .गारगोटी हि गारगोटी च असते ती फक्त दिसण्या पुरती हिरा दिसु शकते या मध्ये शंका नाही परंतु गारगोटीला हिरा समजून तिजोरीत ठेवले अथवा अगदी कुठेही ठेवले तरी हि गारगोटी हिरा होऊ शकत नाही आपलच मुल्यमापन चुकत म्हणून आपण गारगोटी ला हिरा समजतो.तसंच आपल्या दैनंदिन जीवनात अनेक लोक परिचित होत असतात परिचय होत असताना योग्य मूल्यमापन झालं तर पुढील सगळे अनर्थ टळतात.ज्याचा जसा लाभ तो तसं स्वरूप धारण करत असतो आपल्याला मात्र या स्वरूपा मागिल मूल्य मापण योग्य रित्या करता आलं पाहिजे.वेगवेगळे प्रकार करून अथवा कलागुणां दाखवून काही लोक आपल्याशी खुप जवळीक साधतात. परंतु ते आपल्या साठी हितकारक निघतील किंवा आपल्यासाठी लाभदायक असतीलच असं नाही किंबहुना नसतातच त्यापैकी काही आपलं हित करतात तर काही आपलं प्रचंड नुकसान करतात म्हणून आपल्या संपर्कात येणा-या प्रत्येक व्यक्ती हा कशा पदधतीचा आहे हे मुल्यमापन आपल्यला सुरवातीला समजणं खुप महत्वपूर्ण आहे.आपण आपल्या संपर्कात आलेल्या व्यक्ती च मुल्यमापन करण्यात जर चुकलो तर मग मात्र आपलं आतोनात नुकसान होऊ शकत.वास्तविक गारगोटी हि हिरा भासते म्हणून आपण तीच जतन केल तर तो वेळ आपला व्यर्थ जाईल म्हणूनच मुल्यमापन हे खुप महत्वाचे आहे ज्याला मुल्यमापन कळलं त्याला जीवन समजलं आणि ज्याचं मुल्यमापन चुकलं त्याच आयुष्य बिघडलं एकंदरीत घडण आणि बिघडण हे मुल्यमापनावर अंवलबुन असत. म्हणून वेळ काळ परस्थिती हि कोणतीही असु द्या कशीही असु द्या दिसण्यावर जाऊ नका वास्तव स्वरूप जाणा. नजर धोका खाऊ शकते पण मुल्यमापन धोका खाऊ शकत नाही म्हणून योग्य मुल्यमापन करायला शिकलं पाहिजे.आपल्याला जीवनातील वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळी माणसं आपल्या संपर्कात वेगवेगळ्या कारणांमुळे येऊ शकतात त्यातील काही माणसांमुळे भविष्यात आपल्याला मनस्ताप सहन करावा लागतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा म्हणून कला व सांस्कृतिक स्पर्धा : जयश्री सोनकवडे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने बुधवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, खोकडपुरा छत्रपती संभाजीनगर येथे छत्रपती संभाजीनगर विभागातील शासकीय निवासी शाळेच्या आणि शासकीय वसतिगृहातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी कला व सांस्कृतिक कार्यक्रमाचे दि.०३. जानेवारी रोजी सकाळी ९.०० वाजता आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि परभणी जिल्ह्यातील शासकीय निवासी शाळेतील आणि शासकीय वसतिगृहातील जवळपास ५०० विद्यार्थी -विद्यार्थिनी सहभागी झाले. या स्पर्धेसाठी उद्घाटक म्हणून प्रसिद्ध अभिनेत्री तथा सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती डॉ. संजीवनी दिपके आणि डॉ.प्रभू गोरे, संपादक, दैनिक आधुनिक केसरी हे उपस्थित होते. सर्वप्रथम ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सर्व उपस्थित मान्यवरांनी प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. तसेच महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत बोलताना श्रीमती जयश्री सोनकवडे, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी कार्यक्रम घेण्यामागची कार्यालयाची भूमिका विषद केली. तसेच सदृढ व सक्षम नागरिक बनविण्यासाठी तसेच विद्यार्थी विद्यार्थिनींमध्ये असलेले कला नैपुण्य विकसित होण्यासाठी शैक्षणिक वर्ष सन २०२३-२४ पासून कला व क्रीडा महोत्सवाचे विभागीय स्तरावर आयोजन केले जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना वाव मिळेल आणि त्यांचा सर्वांगीण विकास होईल हा दृष्टीकोन या पाठीमागे असल्याचे त्यांनी सांगितले. अशा प्रकारचा कार्यक्रम राज्यामध्ये सर्वप्रथम छत्रपती संभाजीनगर विभागामध्ये घेतला गेला आहे, असे त्यांनी आवर्जून सांगितले. प्रमुख पाहुणे डॉ.संजीवनी दिपके यांनी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याबाबत आणि स्त्री-पुरुष समानतेबाबत आपले मनोगत व्यक्त केले तसेच त्याच्या "ग्लोबल आडगाव" नावाचा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार असून हा चित्रपट मनोरंजनात्मक असून सर्वांनी पाहावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. डॉ.प्रभू गोरे यांनी अशा कार्यक्रमामुळे विद्यार्थी विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास होण्यास चालना मिळत असून अशा कार्यक्रमाचे आयोजन नियमित केले पाहिजे, त्यातून भविष्यातील उत्कृष्ट नागरिक घडतात असे मनोगत व्यक्त केले. तसेच ते स्वतः एक आश्रमशाळेचे माजी विद्यार्थी असून त्यावेळी



त्यांच्या शिक्षकांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे तसेच कडक शिस्तीमुळे त्यांची जडणघडण चांगली झाली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच त्यांनी यावेळी एक गोष्ट विद्यार्थ्यांना सांगितली यामध्ये जे आपल्याकडे आहे त्याचा वापर समाजाच्या भल्यासाठी केला पाहिजे असा बोध देणारी कथा विद्यार्थ्यांना सांगितली. प्रास्ताविक श्रीमती अस्मिता जावळे, मुख्याध्यापिका, मुलांची शासकीय निवासी शाळा, शिरूर कासार, जि.बीड, डॉ. दिलीप गिरी, मुख्याध्यापक, शासकीय निवासी शाळा, जालना आणि डॉ.वैशाली कळासरे, गृहपाल यांनी केले. कार्यक्रमासाठी प्र.शि.निंबाळकर , सहाय्यक संचालक (वित्त व लेखा), श्रीमती सुनिता थिटे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, छत्रपती संभाजीनगर, श्रीमती लाखाडे, विशेष अधिकारी (शानिशा), सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, छत्रपती संभाजीनगर, एन.बी.भामरे, मुख्याध्यापक, शानिशा, वैजापूर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून महादेव हंडाळे, अधिव्याख्याता, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर आणि श्री.विशाल तायडे, अधिव्याख्याता, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांनी काम पहिले. सदर कार्यक्रम उत्कृष्ट रीतीने पार पडावा यासाठी श्रीमती बेबी दांडगे , समाज कल्याण निरीक्षक आणि मंगेश श्रीरामवार, समाज कल्याण निरीक्षक यांनी परिश्रम घेतले.



## ज्ञानज्योत सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** मुलींसाठी साक्षरतेची वाट प्रकाशमान करणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बुधवार दि.3 रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सुलतानपूर येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक सुरेश राहणे क्रांतीज्योत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून यांनी अभिवादन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा करून सावित्रीबाईंच्या जीवनावर आपले मनोगत व्यक्त केले तर काही विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या जीवन दर्शन घडवण्यासाठी भाषणे दिली.

यावेळी विद्यार्थ्यासह मुख्याध्यापक सुरेश रहाणे, मिलिंद गिरधारी, मार्तंड चौधरी, सविता राऊत, रेखा खरात, पद्मा अधाने, कविता चव्हाण,हुमायून शेख आदीची उपस्थिती होती.

## आपण शोषणाचे बळी ठरत आहोत : फरांदे

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** समाजात चाललेल्या सर्वप्रकारच्या शोषणाला महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचा विरोध होता.माणुस जन्मापासून ते मेल्यानंतर ही त्याच्या नावानं शोषण होत होतं. चुकीच्या अंधश्रद्धा पसरविल्या जात होत्या.याचं चित्रण महात्मा फुले यांनी मांडलेलं आहे.हे शोषण आजही आपल्या समाजात आहे.महात्मा फुलेंनी शोषणावर वस्तुनिष्ठ पद्धतीने विश्लेषण केलेले आहे.महात्मा फुले यांचे विचार आपण आत्मसात केलेले आहेत की नाहीत? तर अजिबात नाही. आपण महापुरुषांना डोक्यावर घेतलेले आहे. डोक्यात घेतलेले नाही.त्यामुळे या शोषणाचे आजही आपण बळी ठरत आहोत.असे प्रतिपादन सत्यशोधक अभ्याक डॉ.प्रमोद फरांदे यांनी केले. ते तरडगाव, ता.फलटण येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यान कार्यक्रमात बोलत होते. या कार्यक्रम प्रसंगी आमदार दीपकराव चव्हाण, माजी सभापती वसंतराव गायकवाड, सरपंच जयश्रीताई चव्हाण, पंचायत समिती सदस्या विमलताई गायकवाड, विकास सोसायटी चेअरमन मोहन अडसूळ,महावीर शहा, सुभाष गायकवाड, माजी उपसभापती दिलीपराव अडसूळ,पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशनचे अध्यक्ष गिरीश बनकर,पाणीपुरवठा अध्यक्ष विजयकुमार शहा, बाळासाहेब मोहिते, राजेंद्र गायकवाड, सुभाष झुंजार, माजी सरपंच काशीबाई झुंजार,विठ्ठलराव गायकवाड, दिनेश अडसूळ, मंगल शिंदे, माजी सरपंच अतुल गायकवाड,संतोष कुंभार, दीपक गायकवाड, लक्ष्मीबाई अडसूळ आदीं सह इतर मान्यवर उपस्थित होते. डॉ.प्रमोद फरांदे पुढे म्हणाले की,सावित्रीबाई फुले ध्येयवादी नसत्या तर त्या पण चूल आणि मूल इथं पर्यंत मर्यादित गेल्या असत्या.त्या आपल्या ध्येया पासून परावृत्त झाल्या असत्या. सावित्रीबाई फुले प्रखर तत्वनिष्ठ व ध्येयवादी महिला होत्या. आज ही आपण ज्या ज्या क्षेत्रात काम करत असू हा ध्येयवाद आपण प्रत्येक क्षेत्रात अंगीकार करणं गरजेचे आहे. ही प्रेरणा सावित्रीबाई फुलेंकडून घेणं गरजेच आहे.

महात्मा फुले सांस्कृतिक मंडळ तरडगाव व समस्त ग्रामस्थ यांच्या वतीने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून मोठया उत्साहपूर्ण वातावरणात हा जयंती कार्यक्रम साजरा करत असताना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव असलेल्या नायगाव येथून महात्मा फुले सांस्कृतिक मंडळाने आणण्यात आलेल्या ज्योतीचे स्वागत तरडगाव बसस्थानक परिसरात करण्यात आले. यावेळी समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते. तद्नंतर महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेची मिरवणूक ग्रामपंचायत कार्यालयापर्यंत काढण्यात आली. यावेळी शालेय विद्यार्थ्यांचा व शिक्षकवृंद यांचा सहभाग होता. तसेच महिला पुरुष ही उपस्थित होते.

## लामणगाव येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील लामणगाव येथे शाळेत सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. आज दि.०३ जि. प .प्रा .शाळा लामणगाव येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी मु अ जाधव सर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जिवनावर प्रकाश टाकून अनेक विद्यार्थ्यांनी भाषण व गीते सादर केली.

या प्रसंगी शालेय अध्यक्ष विष्णू मालोदे, उपसरपंच अशोक मालोदे, सरपंच बाळूभाऊ गायकवाड, सदस्य सोमिनाथ मालोदे, आबा मालोदे, मु अ बी. डी. जाधव, विजयसिंग भंडारी, मनोज साळुंके, शेख मुस्तफा, संतोष बोबडे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## मंत्री अब्दुल सत्तार यांच्या वाढदिवसानिमित्त जि.प.सदस्य गोपीचंद जाधव यांनी केला सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** सोयगाव मतदार संघाचे शिवसेना शिंदे गटाचे लाडके अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार यांचा काल ता.1 जानेवारीला मोठ्या थाटामाटात वाढदिवस साजरा करण्यात आला. यानिमित्ताने जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव यांनी सेना भवन येथे कॅबिनेट मंत्री अब्दुल सत्तार यांचा भव्य सत्कार केला.अल्पसंख्याक पणन मंत्री अब्दुल सत्तार सिल्लोड या त्यांच्या मतदारसंघात समर्थकांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षावही केला. मतदारसंघ, समर्थक आणि आपल्या कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांसाठी कायम तत्पर असणाऱ्या मंत्री अब्दुल सत्तार यांनी वाढदिवसानिमित्त जंगी सेलिब्रेशन आणि मनोरंजनाचीही जोरदार तयारी केली. दरवर्षीप्रमाणे सिल्लोड महोत्सवाचे आयोजन, सांस्कृतिक मनोरंजनाची सोय केली.पणन मंत्री अब्दुल सत्तार यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी



आठ वाजल्यापासून येथील यांच्या निवासस्थानी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी शिवसैनिकांची मोठी गर्दी उसळली होती. मा.ना.अब्दुल सत्तार साहेब ( कॅबिनेट मंत्री पणन व अल्पसंख्याक म.राज्य ) यांचं वाढदिवसा निमित्ताने भव्य सत्कार सोहळा दि.२ मंगळवार रोजी सोयगाव सेना भवन येथे पार पडला लाखो कार्यकर्ते या कार्यक्रमात उपस्थित राहून आपल्या लोकनेत्याला शुभेच्छा दिल्या. सोयगाव सेनाभवनात पण जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव यांच्या हस्ते साहेबांचा मोठा भव्य सत्कार करण्यात आला.या वेळी मा. जि.प.सदस्य गोपीचंद जाधव यांच्या वतीने ना.अब्दुल सत्तार साहेब यांचं सरपंच उपसरपंच व विविध सोसायटीच्या चेअरमन उपचेअरमन यांच्या हस्ते भव्य सत्कार व शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी उपस्थित बबलू हाजी सेठ, सरपंच शिवआप्पा चोपडे, गणेश खेरै, सरपंच विनोद जाधव, सरपंच सुरेश राठोड, सरपंच अजीम पठाण ठाणा, श्रावण राठोड, श्रावण जाधव, मा.पं. समिती सदस्य मगन जाधव, उमर पठाण, आरिफ पठाण आदी सोयगाव वरखेडी येथील शिवसैनिक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## वैजापुरात सावित्रीबाई फुले यांना अभिवादन


आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त येथील महात्मा फुले यांच्या पुतळा परिसरात शहरातील व ग्रामीण भागातील नागरिकांना बुधवार(ता,०३)रोजी एकत्रित येऊन क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा जोतिबा फुले यांना अभिवादन केले. धोंडीरामसिंह राजपुत म्हणाले की, सावित्रीबाई फुले यांचे कार्य समुद्रातील "दीपस्तंभ"सारखे आहे. या प्रसंगी माळी समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते व समता परिषदचे काशिनाथ शेठ गायकवाड, ओबीसी चे अध्यक्ष दशरथ बनकर, बाबासाहेब गायकवाड, जयमाला वाघ, मेजर गौतम गायकवाड, माजी नगरसेविका सुनंदा माळी, प्रकाश माळी, स्वप्नील जेजुरकर, राजेश गायकवाड, दिलीप अनर्थे, शाहीर अशोक बागुल, संजय बोरनारे, श्रीमती पवार, केशव आंबेकर, अशोक देवकर, मोती वाघ, रतीलाल गायकवाड, ऋषी जुंधारे, मंजुषा ढाकरे,अण्णासाहेब ठेंगडे, साहेबराव पडवळ, मनीष गणवीर, शशिकांत भालेराव, अशोक आप्पा पवार, संजय अभंग कमलेश आंबेकर, अनिता तांबे, शिवलिंग साखरे सह शहर व ग्रामीण भागातील तळा गळातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्र संचलन जगन गायकवाड यांनी केले.

# बाप माझा.. आभाळाएवढा ..

आधुनिक केसरी

**ज्या वटवृक्षाच्या पोटी मी जन्म घेतला..आज त्यांची ९० वी जयंती. रा. ना. पवार म्हणजे चालतं बोलतं व्यासपीठ. स्वतः मागे राहून अनेकांना घडविणारा किंग मेकर, शिक्षण क्षेत्रातील अचूक आणि सखोल ज्ञान असलेला शिक्षण तज्ञ, समाजाच्या सुख दुःखात रमणारा समाजसेवक, विविध सभा गाजविणारा ज्येष्ठ वक्ता, अनेक सभांचे भरजरी सूत्रसंचालन करणारा सूत्रसंचालक, शाहू फुले आंबेडकर विचारसरणी जगणारा आणि मनातून तसे वागणारा, संत वाङ्मयाचा गाढा अभ्यासक, हजारो श्रोत्यांना खिळवून ठेवणारा वक्ता आणि प्रवचनकार....**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

श्रीकृष्ण किती चांगला आणि किती धूर्त राजकारणी या श्रीकृष्णाच्या विविध पैलूंवर अभ्यासपूर्ण प्रकाशझोत टाकणारा वक्ता, कर्ण, छत्रपती शिवाजी महाराज,राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती संभाजी महाराज,डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यासह रामायण,महाभारत,ज्ञानेश्वरी यावर अभ्यासपूर्ण भाष्य करणारा अभ्यासक अशा विविध रुपात रा ना पवार यांना हजारो लोकांनी अनुभवलेले आहे.

**"नेकीं कर दरिया मे डाल"** या उक्तीप्रमाणे कधीच केलेल्या कामाचे श्रेय न घेता समाजासाठी अविरत झटतच राहणाऱ्या वटवृक्षाच्या पोटी मी जन्म घेतला याचा मला अभिमान आहे.

माझं समृद्ध जगणं आणि समृद्ध असणं ही ज्यांची देण आहे त्या बापाच्या पोटी जन्म घेतल्याचा आणि रा. ना. पवार हीच आमची ओळख असल्याचा मला अभिमान आहे.

त्याकाळी आजूबाजूला शिक्षणाची सोय नसल्याने नातेवाईकांकडे राहून , सुट्टीच्या दिवशी त्यांच्या शेतातील निंदन व इतर कामे करून शिक्षण घेत नंतर निसर्गदत्त बुद्धिमत्तेच्या जोरावर पुढील शाळाबाह्य शिक्षण घेत स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून शिक्षण विस्तार अधिकारी पदापर्यंत जाऊन पोहचलेल्या बाबांच्या आयुष्यात संघर्ष सतत त्यांच्या अंगाखांद्यावर खेळत राहिला.


ज्यांना ज्यांना समाजकारणात आणि राजकारणात मोठे केले त्यांनीच त्यांच्या पदरात उपेक्षा टाकूनही कधीच त्या त्या व्यक्ती बद्दल त्यांनी चकार शब्द काढला नाही वा नाराजी व्यक्त केली नाही की त्यांच्यावर कधी टीका देखील केली नाही. हे सांगणे आणि बोलणे जितकं सहज सोपं वाटतं परंतु तसे जगणे मात्र प्रत्यक्षात अशक्यप्राय असते.

१ मे १९५३ ला ते डोणगाव जिल्हा परिषद शाळेवर शिक्षक म्हणून रुजू झाले आणि त्यानंतर काही महिन्यातच ब्रम्हपुरी या मूळ गावी शिक्षक म्हणून बदली होऊन आले. १९ ऑक्टोबर १९६४ पर्यंत जि.प.शाळेवर इयत्ता ८ वी ला शिक्षक म्हणून सेवा दिली. शिक्षक म्हणून कार्यरत असतांना स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून बढती होत २० ऑक्टोबर १९६४ ते २८ फेब्रुवारी १९६९ पर्यंत ते शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून बुलढाणा जिल्हा परिषद ला कार्यरत होते.

त्यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष असणारे समाजभूषण स्व. आयाजी पाटील यांच्या म्हणण्यावरून सहायक उपशिक्षणाधिकारी या पदाचा राजीनामा देऊन श्री. शिवाजी शिक्षण संस्था मेहकर च्या सुलताणपूर या शाखेच्या विद्यालयाचा मुख्याध्यापक पदाचा पदभार त्यांनी सांभाळला.

माजी मुख्यमंत्री तथा देशाचे माजी कृषिमंत्री शरद पवार यांच्या अनेक सभांचे ज्यांनी सूत्रसंचालन केले आणि समाजभूषण दलितमित्र स्व. आयाजी पाटील यांच्या एकसष्ठी सोहळ्याला तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण उपस्थित होते,त्यांच्याच हस्ते स्व. आयाजी पाटील यांचा भव्यदिव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.मेहकरच्या इतिहासात आजपावेतो एवढा मोठा सत्कार सोहळा संपन्न झाला नाही असा भव्यदिव्य सत्कार सोहळा असणाऱ्या त्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबांनी अर्थात रा. ना. पवार यांनी केले होते. कैक वर्षांनंतर देखील त्या सुत्रसंचालनाचे किस्से आज देखील निघतात. बाबांचे भाषण ऐकायला त्याकाळी लोकं बैलगाडीने यायची.त्यांना विषयाचे कधी बंधन नव्हते.ऐन वेळेवर कुठल्याही विषयावर ते अधिकारवाणीने बोलू शकत होते. आज मी देखील देशपातळीवरील नेत्यांच्या, मुख्यमंत्र्यांच्या, उपमुख्यमंत्र्यांच्या तसेच अनेक मोठे मंत्री यांच्या सभांचे ,मोठमोठ्या मोर्चांचे तसेच अनेक शोकसभांचे सूत्रसंचालन केले आहे परंतु जी खोली रा ना पवार यांच्या वक्तृत्वात आणि सुत्रसंचालनाची होती ती माझ्यात नाही हे मी सतत कबूल करत आलो आहे.

माझ्या वडिलांचा चौफेर संचार होता. पोवाडा सारखा साहित्यातील अवघड प्रकार असेल, कविता असेल, निवडणुकी दरम्यानचे अनेक स्लोगण असतील यावर त्यांची कमांड होती.




स्व. जगारावजी चव्हाण, स्व. भाऊसाहेब लोढे,स्व. सुमनताई पाटील हे आमदार असण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.माजी मंत्री शिवाजीराव पाटील,सहकार महर्षी स्व भास्करराव शिंगणे यांच्याशी त्यांची असलेली गाढ मैत्री जिल्ह्यात सर्वश्रुत होती.

सहकारमहर्षी स्व. भास्करराव शिंगणे हे सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाकडून खटारा या चिन्हावर निवडणूक लढवत असताना त्यांच्या प्रचाराची प्रमुख धुरा केवळ दोन माणसांच्या खांद्यावर होती,त्यात स्व. साहेबराव खारोडे गुरुजी आणि रा. ना. पवार...

संपूर्ण हयातीत स्व. भास्करराव शिंगणे यांनी बाबांचा कुठलाच शब्द टाळला नाही. प्रसंगी अनेक कारणावरून बाबा शिंगणे साहेबांसारख्या सर्वव्यापी नेतृत्वावर चिडलेले, त्यांच्यावर रागावलेले आम्ही अनुभवलेले आहे. त्या रागावण्यात आणि चिडण्यात होता तो अधिकार.

राजकारणातील अनेकांचे मार्गदर्शक आणि पाठीराखे असलेल्या बाबांना मात्र प्रतिकूल परिस्थितीत फारशी कुणी साथ दिली नाही.ज्या नातेवाईकांना मोठे केले,मदत केली त्यांनी देखील कधी फिरकून बघितले नाही तर आज देखील आम्ही जे काही आहोत ते केवळ भाऊसाहेबांमुळेच ( रानामुळेच ) असे म्हणणारे देखील अनेक आहेत. संघर्षयात्री असणाऱ्या रानांच्या विचारांचा गोडवा जपण्याचा आम्ही सारी भावंड प्रयत्न करतो. समाजाचे आपल्यावर खूप ऋण आहे.आणि ते सतत फेडण्याचा प्रयत्न केले पाहिजे असे ते सतत म्हणायचे. समाजापेक्षा कुणीही मोठे नाही ही त्यांची धारणा होती. समाजाच्या सुखदुःखात सहभागी व्हा असे सांगून तुमच्याकडे किती एकराचा सातबारा आहे,किती पैसे बँकेत जमा आहे यावर तुमची श्रीमंती ठरत नाही,तर लोकांच्या प्रेमाचा सातबारा तुमच्या नावावर किती आहे यावर तुमची सामाजिक श्रीमंती ठरत असते.तुमच्या चौकटीत सतत लोकांच्या चपला जोड्यांची गर्दी असावी या मताचे ते होते. संपत्ती कमावणे याकडे कधी लक्ष न देता समाजासाठी ते सतत झटत राहीले आणि तोच वारसा काही प्रमाणात चालविण्याचा आम्हा भावंडांचा प्रयत्न असतो. आज बाबांची ९० वी जयंती. आज त्यांना गोडवा च्या रूपाने हीच श्रद्धांजली. त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन

# विश्वास व भावना



डॉ.बलराज पांडवे
मो.नं. 9511885093

आधुनिक केसरी

**"विश्वासाचा पक्षी एकदा उडाला की पुन्हा त्या घरट्यात कधीच येत नाही" म्हणून विश्वास एक मनाचं नातं आहे .अंतरीक भावनेच्या पंखावर नेहमी उडत असते. जीवनात माणसाला अनेक गोष्टींचे चांगले आणि वाईट अनुभव मिळत असतात .जीवनाच्या पटलावर त्याची गोंदल्या प्रमाणे घट्ट प्रतिमा तयार होते. त्यातूनच आयुष्याचे विश्व तयार होते. त्या विश्वात अगं तूज गोष्टींना उगीच भावनेशी जोडले जाते.**

ज्याचे वर्णन व दर्शन करता येत नाही फक्त त्याची जाणीव होऊ शकते. परंतु अनुभव कथन करता येत. भावना ह्या कधीकधी निशब्द असतात. कधी व्यक्त होतात तर कधी व्यक्त होत नाहीत. परंतु त्याची जाणीव व अनुभूती होत असते. भावनेचे बंध रेशमी धाग्यांनी ह्रदयाशी जोडली जातात आणि विश्वासाच्या सागरात निरंतर तरंगत असतात. विश्वासाचे पंख घेऊन तो पक्षी आकाशी झेप घेत असतो व स्वच्छंद विहरत असतो. भावनेच्या दुनियेमध्ये जगण्याचा प्रयत्न करत असतो .आणि त्याला ते विश्व वास्तविक व खरे आहे असे वाटते....! बऱ्याच वेळा भावना जाणून घेण्याचा प्रयत्न सातत्याने केला जातो. परंतु भावना व्यक्त करणे खूप अवघड असते त्याची फक्त जाणीव व अनुभूती होऊ शकते. विश्वासाच्या घट्ट भिंतीने भावनेचे मंदिर उभारणे यालाच तर जीवन म्हणतात. जीवनाचे अनेक पैलू भावनेशी जोडलेले असतात आणि विश्वासाच्या जोरावर पंखांना बळं मिळते व मिळालेल्या बळाच्या शक्तीवर माणूस उंच झेप घेत असतो. जगायचे म्हणून जगणे यापेक्षा विविध पैलू घेऊन जीवन पटलावर नटसम्राट होऊन जगणे यालाच तर जीवनाचे सार्थक झाले असे म्हणतात..

राग, लोभ, द्वेष, मद, मत्स, अहंकार ह्या गोष्टी भावनेला व विश्वासाला मारक ठरतात. आपली दुनिया, आपली माणसं, आपली नाती ,आपले विश्व प्रत्येकाने जिवापाड जपणे आवश्यक आहे. एखादा पक्षी आकाशी उंच भरारी घेऊन स्वच्छंद उडत असतो. मात्र जेव्हा तो परत येतो तो आपल्या इलाशा घरट्यातच!

कळत नकळतआयुष्याच्या वळणावरती अत्यंत सुखद अविस्मरणीय क्षण मिळतात .सदा सर्वदा आठवणीत राहतात .ह्रदयाच्या कोपऱ्यात स्वतःचे उत्तम स्थान निर्माण करतात .असे आनंदी व अतुल अतुलनीय क्षण.... एक जीवनाची शिदोरी आहे... जेव्हा जेव्हा मन उदास होते ....तेव्हा त्या शिदोरीत बांधून ठेवलेले व जतन करून ठेवलेले सुखाचे क्षण म्हणजे जिवनास मिळणारी प्रेरणा आहे. एक प्रकारची जगण्याची उर्मी आहे ,एक प्रकारचा उत्साह आहे, तो एक आनंद आहे,



विलक्षण गती आहे, आयुष्याची जीवनरेखा आहे, जीवनात दरवळणारा सुगंधी गंध आहे .ते एक आयुष्याचे मांडलेले गणित आहे.

आनंदी क्षण जीवनात येणे, आपल्याशी एकजीव होणे, प्रयत्नांना प्रोत्साहित करून माणसाला सत्कर्म करण्यास प्रवृत्त करणे आणि अंतकरणात नेहमी आशा जिवंत ठेवणे या गोष्टी नेहमी भाग्यवंताच्या पदरी पडत असतात. या गोष्टींना जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. ह्या गोष्टी जिवापाड जपावे. आठवणीची वाट करून कर्माच्या मार्गावर एखाद्या पथीकासारखे चालत जावे .जीवनात कधीही न डगमगता मार्गक्रम चालू ठेवावे. मिळणाऱ्या आनंदी क्षणात रममान होऊन आयुष्यात विविध रंग भरण्याचा प्रयत्न करावा. नाहक कुणास वेदना होतील असे करू नये .नाहक कुणाच्या जीवनाच्या रंगीन चित्रात आपले बेरंग टाकून चित्र विद्रुप करण्याचा प्रयत्न करू नये. मिळणारे आनंदी क्षण अचूक लूटणे हेच जीवनमूल्य आहे .आत्मविश्वासाने केलेली वाटचाल कधीही आपल्याला विचलित करत नाही. जसे की हंस पक्षी दूध पीत असताना दुधातील पाणी बाजूला सारून फक्त दूधच जसे प्राशन करतो. तद्वतचआयुष्यातील चांगल्या वाईट घटना कडे पाहतांना जे चांगले आहे तेवढेच घ्यावे जे वाईट आहे ते सोडून द्यावे. कोण आपले ,कोण परके यात न पडता आपल्या जीवन प्रवासातील मिळालेले अमूल्य घटक समजून त्यांचं स्वागतच करावे .भावना व विश्वास आपल्या विचारावर आधारित एक विचाराचे मंथन आहे .मानले तर मनाचे तरंग आहेत .या दोन गोष्टी ज्यांना सांभाळणे शक्य होईल ती व्यक्ती एक उत्तम व्यक्ती म्हणून ठरू शकते .म्हणून जेथे विश्वास आहे तेथे भावनाची कदर आहे, तेथे आदर आहे. म्हणूनच भावना जपणे ,भावना जाणून घेणे, आणि त्या भावनेच्या विश्वासात जगणे, यातूनच एक नवीन पर्व तयार होते. विश्वासाने उभारलेले व भावनेने रेखाटलेले एक सुंदर स्वप्न शिल्प होऊ शकते. जीवन पटलावर गोंदलेल्या अनेक क्षणाचे साक्षीदार होऊन आयुष्याची सुंदर बाग फुलवू शकते.. त्या बागेत फुलणारे रंगीबेरंगी फुलं, त्या बागेत भ्रमण करणारी पाखरं, त्या बागेत वाटणारी प्रसन्नता ,मनाला निश्चितच मोहित करते. म्हणून जीवनाच्या पटलावरती आपले नाव गोंदले गेले पाहिजे.जीवनाच्या पटलावर नटसम्राट सारखे आपण स्टेजवर उभे राहावे आणि संपूर्ण थियटर मध्ये टाळ्यांचा कडकडाट व्हावा. हेच तर मानवी जीवनाचे मूल्य आहे .या जगात प्रत्येक व्यक्ती येतो आणि जातो पण त्यांनी केलेल्या काही चांगल्या गोष्टींच्या पाऊलखुणा इतर लोकांना प्रेरणा देउन त्यांच्या जीवनामध्ये उर्मी व उत्साह निर्माण करू शकतात. अशा पाऊलखुणांचा आदर्श घेवून जिवापाड जपणूक करावी. जीवनाचा सारं समजून आत्मसात करणे कधीही हितकारकच आहे....!

# एंटरटेनमेंटची डिलिव्हरी करायला येतोय 'डिलिव्हरी बॉय'

आधुनिक केसरी

काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर एक गिफ्ट रॅप केलेल्या एका बॉक्समधून एक गोंडस बाळ बाहेर आल्याचे दिसत होते. त्यावेळी अनेकांना प्रश्न पडला होता की डिलिव्हरी बॉय आणि या बॉक्सचा नेमका संबंध काय? तर प्रेक्षकांची ही उत्सुकता थोड्या फार प्रमाणात कमी होणार आहे. कारण आता 'डिलिव्हरी बॉय'चे एक जबरदस्त पोस्टर सोशल मीडियावर झळकले असून ते सगळ्यांचेच लक्ष वेधून घेत आहे. पोस्टरमध्ये एका आलिशान खुर्चीवर प्रथमेश परब विराजमान झालेला दिसत असून त्याच्या मागे अंकिता लांडे पाटील डॉक्टरच्या ऍप्रनमध्ये दिसत आहे. तर प्रथमेशजवळ पृथ्वीक प्रताप आहे. या पोस्टरमध्ये विशेष लक्षवेधी ठरत आहेत त्या आठ गरोदर बायका... त्यामुळे आता नेमके काय आहे हे प्रकरण, हे जाणून घेण्यासाठी प्रेक्षकांना ९ फेब्रुवारीपर्यंत वाट पाहावी लागणार आहे.

सिनेपोलिस आणि दीपा नायक प्रस्तुत, लुसिया एंटरटेनमेंट प्रोडक्शन्स निर्मित या चित्रपटाचे मोहसीन खान दिग्दर्शक आहेत. डेव्हिड नादर निर्माते असून फेलिक्स नादर, विकास श्रीवास्तव, विकास सिंग, राझ धाकड आणि ऋषिकेश पांडे सहनिर्माते आहेत. राम खाटमोडे आणि विनोद वणवे यांनी या चित्रपटाचे लेखन केले आहे. चित्रपटाबद्दल दिग्दर्शक मोहसीन खान म्हणतात, " घेऊन येतोय एंटरटेनमेंटची डिलिव्हरी, अशी आमच्या चित्रपटाची टॅगलाईनच आहे. यावरून हा चित्रपट किती गंमतीशीर असेल, याचा अंदाज तुम्ही बांधू शकता. चित्रपट अतिशय मजेशीर आहे. तरीही त्यातून थोडासा सामाजिक प्रबोधन करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. निर्माते डेविड नादर म्हणतात, '' चित्रपटाचा विषय खूप वेगळा आहे. या विषयाचे गांभीर्य घालवू न देता अतिशय हलक्याफुलक्या पद्धतीने तो मांडण्यात आला आहे. मला खात्री आहे, हा चित्रपट प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यात नक्कीच यशस्वी होईल.''



# क्रांतीची ज्योतिर्मयी फुले...



दुशांत बाबुराव निमकर
संपर्क क्र. 9765548949

आधुनिक केसरी

**वैदिककाळात भारतीय नागरिकांचा अमानुष छळ केल्या जात होता. "ढोलगवार शुद्र पशू नारी। सकल ताडन के अधिकारी।। या जात, धर्म, वर्ण या विविध अश्या अनैसर्गिक विषमतेवर आधारलेल्या समाजात अंधश्रद्धा बालविवाह, स्पृश्य-अस्पृश्य, केशवपन, सतीप्रथा, बालहत्या, जठरविवाह, शिक्षणापासून वंचित अशा विविध कुप्रथा समाजात पसरलेल्या होत्या. समाज अशिक्षित असल्याने गुलामगिरीच हेच प्राक्तन आहे असे वाटायचे. त्या काळात अन्याय, अत्याचार मोठ्या प्रमाणावर लोकांवर करीत होते.**

अशिक्षित असल्याने निमूटपणे सहन करणे हेच त्यांच्या हाती होते पण महात्मा फुले यांनी भविष्याचा हा धोखा ओळखला होता म्हणून सामाजिक सुधारणेचा व्रत त्यांनी हाती घेतला.त्यांनी प्रथमतः आपली निरक्षर पत्नी सावित्रीबाईला प्रोत्साहन देऊन शिक्षण दिले.सावित्रीनेही "सावित्री,तू गती आहेस" हे पतीचे वाक्य सिद्ध करून दाखविले.

पतीच्या साहाय्याने निरक्षर ते साक्षरतेचा पाढा सावित्रीमाईने चांगल्या पद्धतीने गिरवला.पतीच्या प्रत्येक सामाजिक,धार्मिक कार्यात सहभागी होऊन सामाजिक सुधारणा करण्यास कोणतीही कमतरता सोडली नाही.शिक्षण हे फक्त उच्चवर्णीयांची जहागिरी आहे या कुविचाराला छेद दिला."जिच्या हाती पाळण्याची दोरी,तीच जगाची उद्धारी" असे महात्मा फुले म्हणत असे म्हणूनच सावित्रीबाई फुले यांच्या मदतीने पुणे येथील बुधवार पेठेत सन १८४८ साली मुलींची पहिली शाळा काढली. पहिल्यांदा फक्त चार मुली होत्या नंतर एकेक करीत मुलींची संख्या अठरावर पोहचली आणि खरी अडचण तर शाळेत शिकविण्यासाठी कुणीही धजावत नव्हते अश्यावेळी देशातील आद्य शिक्षिका तथा मुख्याध्यापिका म्हणून सावित्रीबाई फुले यांनी जबाबदारी सांभाळली.त्यांचा आज जन्मदिन 'बालिकादिन' म्हणून सर्वत्र मोठ्या आनंदात साजरा केला जातो.

महात्मा फुले व सावित्रीबाई यांचा विवाह सुद्धा बालवयातच झाला.'बालविवाह' ही एक कुप्रथा समाजात होतीच.त्याचसोबत सतीप्रथा ही अधिक मोठ्या प्रमाणात असल्याने पतीच्या निधनानंतर सती जाणे भाग पडत होते.विवाह झाल्यानंतर एक-दोन वर्षात दुर्देवाने पतीचे निधन झाल्यास स्त्रीला एकाकी जीवन जगावे लागत असे.पुर्नरविवाह करण्याची मुभा स्त्रीला त्याकाळात नव्हतीच मुळी. एवढंच नाही तर तिचे केशवपन करून समाजात हिणवले जात होते.तुच्छ दर्जाची वागणूक मिळत होती नि विधवा विवाह करण्यास बंदीच होती. विधवांच्या पोटी अनैतिक संबंधाने जन्माला आलेल्या बालकांची हत्या केली जात असे.अश्याच एका ब्राम्हण विधवेच्या पोटी जन्माला आलेल्या मुलांला फुले दाम्पत्यांनी दत्तक घेतले आणि शिक्षण दिले.अश्या कित्येक बालकांसाठी फुले दाम्पत्यांनी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' स्थापन केले.

स्पृश्य-अस्पृश्य ही सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणात होती. शूद्र लोकांना इतरांसोबत व्यवहार



करणे तर सोडाच पण सावली ही पडू दिल्या जात नव्हती. म्हणून ज्योतिबांनी अस्पृश्यासाठी स्वतःच्या घरचा पाण्याचा हौद खुला केला इत्यादी अनेक सामाजिक सुधारणेत अग्रभागी राहून कार्य केले आहे.यात मुलींना तर 'चूल आणि मूल' यातच गुरफटून राहावे लागत होते.घराचा उंबरठा ही ओलांडता येत नव्हता.शाळेत जाण्याचा प्रश्न ही उद्भभवत नव्हता.शिक्षणाशिवाय तरपोपाय नाही हे ओळखून ज्योतिबांनी सावित्रीबाईला शिक्षित केले पण सनातनी लोकांच्या डोक्यात खुपू लागले म्हणून अखेर ज्योतिबांना घरातून काढून टाकण्यात आले.तरी समाजसुधारणेचा घेतलेला वसा सोडला नाही.शाळेत जातांना सवित्रीमाईच्या अंगावर शेण,दगड,माती घालत होते तरी न डगमगता त्यांचा सामना केला.शाळेत जातांना सोबतीला एक साडी घेऊन जात होत्या.परत येतांना घाण झालेली साडी लावून परत येत होत्या.अश्या समाजकंटकाकडून अनन्वित अत्याचार सहन करून शिक्षणाचे बीज रोवण्याचे महत्वपूर्ण कार्य सवित्रीमाईच्या हातून घडले आहे.म्हणून देशातील शिक्षणक्रांतीची जननी म्हणून त्यांना ओळखले जाते.महात्मा फुले यांचे आडनाव जरी गोरे असे असले तरी त्यांच्या आजोबांचा फुले विकण्याच्या व्यवसायावरून फुले हे आडनाव रूढ झाले पण सवित्रीमाईच्या त्यांनी केलेल्या शिक्षणाच्या क्रांतीनेच आज खरोखर 'फुले' झाली असं म्हटले तर चुकीचे होणार नाही. सवित्रीमाईच्या अखंड कार्यास व प्रतिमेस विनम्र अभिवादन!

# केंद्र सरकारच्या कायद्यांना विरोध का होत आहे ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**केंद्र सरकारने केलेल्या अनेक कायद्याला जनतेचा व विषेत: राजकीय पक्षांचा विरोध होत आहे.. राजकिय पक्षांचा विरोध समजून घेता येईल. मात्र यातील अनेक कायद्यांना जनतेने देखील विरोध करत सरकार विरोधात आंदोलन केले आहे व आंदोलन केले जात आहे.नुकत्याच नव्या 'हिट अँड रन कायद्या'विरोधातील ट्रक चालकांच्या आंदोलनाचे देशाच्या आठ राज्यांमध्ये तीव्र पडसाद उमटले. मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, राजस्थान, बिहार, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पंजाब अन् गुजरातमध्ये या आंदोलनाचा प्रभाव जाणवत आहे.**

राज्यामध्येही विविध शहरांत झालेल्या या आंदोलनाचा मोठा फटका सार्वजनिक वाहतुकीला बसला. मुंबई, ठाणे, नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, परभणी, नाशिक, कोल्हापूर आणि सांगलीमध्ये चालकांनी आंदोलन केले.केंद्र सरकारने आणलेल्या 'हिट अँड रन' कायद्याच्या निषेधार्थ देशभरातील ट्रक आणि डंपर चालक संपावर गेले आहेत. हा कायदा चुकीचा असून तो मागे घ्यावा, अशी त्यांची मागणी आहे. या मागणीसाठी मुंबई, इंदूर, दिल्ली-हरियाणा, यूपीसह अनेक ठिकाणी ट्रकचालकांनी आपले ट्रक रस्त्यांवर उभे करून रस्ते अडवले आहेत. ज्या प्रकरणांमध्ये वाहनाच्या धडकेनंतर चालक घटनास्थळावरून पळून जातो ती प्रकरणे 'हिट अँड रन' म्हणून गणली जातात. हिट अँड रन प्रकरणांमध्ये अनेक वेळा जखमी व्यक्तीला वेळीच रुग्णालयात नेल्यास किंवा प्राथमिक उपचार मिळाल्यास तो वाचू शकतो. जुन्या कायद्यानुसार हिट अँड रन प्रकरणात दोन वर्षांच्या तुरुंगवासाची तरतूद होती आणि जामीनही मिळत होता.

केंद्र सरकारच्या माध्यमातून मोटार वाहन कायदा पारित करण्यात आला आहे. नवीन कायद्यानुसार वाहनचालक अपघात करून फरार झाल्यास तसेच प्राणघातक अपघाताची माहिती पोलिसांना न दिल्यास चालकांना १० वर्षांपर्यंत तुरुंगवास होण्याच शक्यता आहे. यापूर्वी, आयपीसी कलम ३०४ ए अंतर्गत आरोपीला फक्त दोन वर्षांपर्यंत तुरुंगवास भोगावा लागत होता. सोबतच सात लाख रुपये दंड देखील आकारण्यात येणार आहे. यालाच हिट-अँड-रन कायदा असे म्हटले आहे.

यापूर्वी या प्रकरणात आरोपी चालकाला काही दिवसांत जामीन मिळायचा आणि तो पोलिस ठाण्यातूनच बाहेर पडत असे. मात्र, या कायद्यांतर्गत दोन वर्षांच्या तुरुंगवासाचीही तरतूद होती. नव्याने तयार करण्यात आलेल्या भारतीय न्याय संहितेच्या कलम १०४ मध्ये हिट अँड रन कायद्याचा समावेश करण्यात आला आहे. यानुसार, चुकीच्या पध्दतीने वाहन चालवल्यामुळे किंवा निष्काळजीपणामुळे एखाद्याचा मृत्यू झाल्यास, चालकाला जास्तीत जास्त ७ वर्षांची शिक्षा आणि दंडही ठोठावला जाईल. कलम १०४ (A) मध्ये याचा उल्लेख करण्यात आला आहे. त्याचवेळी, कलम १०४(B) मध्ये असे स्पष्टपणे लिहिले आहे की, जर अपघात झाला आणि वाहनाला धडक दिल्यानंतर, चालक स्वतः किंवा वाहनासह घटनास्थळावरून पळून गेला, तर त्याला १० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा होईल. केवळ ट्रकचालकच नाही तर बस, टॅक्सी, ऑटोचालकही याला विरोध करत आहेत. नवीन नियम खाजगी वाहन चालकांनाही लागू होतील. नवीन कायद्यातील तरतुदी खूप कडक असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.म्हणून या कायद्याला विरोध होत आहे.मात्र सरकारने हा कायदा अधिक कडक का केला.ही बाजू देखील समजून घेणे गरजेचे आहे.



हिट अँड रनचे आकडे पाहिले तर नवीन कायद्याच्या कडकपणाचे कारण समजू शकते. सरकारी आकडेवारीनुसार, दरवर्षी ५० हजार लोक हिट अँड रन प्रकरणांमध्ये आपला जीव गमावतात. आंदोलक वाहनचालकांनी असा युक्तिवाद केला की, धडकेनंतर पळून गेल्यास नवीन कायद्यानुसार त्यांना कठोर शिक्षा भोगावी लागेल आणि थांबल्यास घटनास्थळी उपस्थित जमावाकडून त्यांच्यावर हल्ला होऊ शकतो. अनेकदा रस्ता अपघात झाल्यास घटनास्थळी उपस्थित जमाव संतप्त होऊन चालकावर हल्ला करतात. अनेकवेळा हा हिंसक जमाव केवळ मारहाण करून थांबत नाही आणि प्रकरण मॉब लिंचिंगचे रूप घेत असते. याआधी देखील कृषी कायद्याला विरोध झाला होता.कृषी कायद्याला अनुसरून भारतात फार मोठे आंदोलन झाले.खाजगी क्षेत्र हे मार्केट फोर्सवर अवलंबून असतं. अशावेळी जर शेती आणि शेतकऱ्यांना कायदेशीर संरक्षण दिलं नाही तर ते देशोधडीला लागतील. आजही भारतात कृषी क्षेत्रावर पन्नास टक्क्यापेक्षा जास्त रोजगार अवलंबून आहेत. सरकारच्या या नव्या कायद्यांचा त्या रोजगारांवर थेट परिणाम होईल.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. देशाच्या जीडीपी मधील कृषीचा हिस्सा जरी घटत असला तरी आजही सर्वाधिक रोजगार देणारं क्षेत्र म्हणून याकडं पाहिलं जातं. अशावेळी कृषीसंबंधी सरकारचा कोणताही निर्णय त्या क्षेत्रावर सकारात्मक वा नकारात्मक परिणाम करू शकतो.

मोदी सरकारनं २०२२पर्यंत शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याचं लक्ष्य ठेवलंय. त्यासाठी अनेक नव्या योजना आणि निर्णय घेण्यात आलेत. सप्टेंबरमध्ये संसदेत घाई-गडबडीत पारित करण्यात आलेले आणि नंतर कायद्यात रूपांतर झालेले तीन नवे कृषी कायदे सरकारच्या याच धोरणाचाच एक भाग.केंद्र सरकारच्या मते, या नव्या कृषी कायद्यांमुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडेल. असं असेल तर मग या कायद्याला शेतकऱ्यांचा विरोध झाला. केंद्र सरकारने सप्टेंबरमध्ये २०२२ कृषी उत्पादने व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन व सुविधा), शेतकरी (सबलीकरण व संरक्षण) हमीभाव करार- कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग आणि अत्यावश्यक वस्तू (सुधारणा) कायदा हे तीन कृषी कायदे पास केले. सरकारच्या या कायद्यांना देशभरातील शेतकरी संघटनांनी विरोध केला होता. त्यातही सर्वात जास्त विरोध पंजाब, हरियाणा उत्तर प्रदेश या राज्यातून झाला होता.शेवटी सरकारने तिन्ही कृषी कायदे मागे घेतले.

मोदी सरकारनं न्यायालयात ज्या शेतकरी आंदोलनात खलिस्तानी सहभागी असल्याचं म्हटल होतं, त्याच आंदोलनामुळं पंतप्रधान नरेंद्र मोदींना देशाला संबोधित करत तीन कृषी कायदे मागे घेण्याची घोषणा करावी लागली.

डिसेंबर २०१९ रोजी लोकसभेत मोदी सरकारने सीएए हा कायदा संमत करून घेतला. राज्यसभेतही त्याला मंजुरी मिळाली . लगोलग त्यावर राष्ट्रपतींनी सही करून त्याला कायद्याचे स्वरूप दिले आहे.

असा कायदा झाल्याबरोबर आसाम, त्रिपुरा इत्यादी पूर्वेतर राज्यांतून असंतोषाचा भडका उडाला. या कायद्याविरोधात तेथील आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात अनेक लोकांचा बळी गेला.त्यानंतर जामिया मिलिया विद्यापिठाच्या विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष लाठी हल्ल्यानंतर या कायद्याविरोधात देशातील तमाम जाती-धर्माच्या जनतेत तीव्र असंतोष पसरला. उत्तर भारतात झालेल्या या कायद्याविरोधातील आंदोलनात अनेक. लोक ठार झालीत. अजूनही या विरोधातील आंदोलन थांबलेले नाही. अनेक विरोधी पक्षांनी व मुस्लिमांनी या कायद्याला विरोध केला.मात्र एनआरसी ही काही संघ किंवा भाजपची निर्मिती नाही. काँग्रेसच्या काळातच केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यात झालेल्या करारानुसार, सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली असामी नागरिकांना ओळखण्यासाठी एनआरसीची निर्मिती झाली. नागरिकत्व कायदा बिगर मुस्लिमांनाच नागरिकत्व देतो. त्यामुळे पाकिस्तान, अफगाणिस्तान, बांग्लादेशमधून जे जे बिगर मुस्लीम भारतात आलेले आहेत, त्या सर्वांना आधी भारतीय नागरिकत्व दिलं जाणार. मग एनआरसीअंतर्गत देशाबाहेर ज्या घुसखोरांना बाहेर काढायचं आहे त्यात उरतं कोण तर फक्त मुस्लीम. जे भारतीय मुस्लीम आहेत त्यांना कुणी बाहेर पाठवू शकत नाही हे खरंच आहे. पण यात नागरिकत्व सिद्ध करण्याचं दडपण बाकी कुठल्या धर्मीयांपेक्षा मुस्लिमांवर अधिक असणार आहे. शिवाय घुसखोर बाहेर पाठवायचेत तर ते केवळ मुस्लीम घुसखोरच का पाठवायचे आहेत? घुसखोर कुठल्याही धर्माचा असला तरी त्याचा स्थानिकांच्या हक्कांवर, इथल्या व्यवस्थेवर सारखाच भार पडतो. आसाममध्ये याला सर्वाधिक विरोध होण्याचं कारण हेच आहे. कारण घुसखोर हिंदू, बौद्ध आहे म्हणून त्याला स्वीकारा, अशी मानसिकता या लोकांची नाही. त्यांच्यासाठी त्यांच्या वांशिक, भाषिक अस्मिता या प्रखर आहेत आणि मुळात सीएबीची गरज का पडली तर एनआरसीचा प्रयोग आसाममध्ये अयशस्वी झाला म्हणूनच. आसाममध्ये ४० लाख लोकांची नावं एनआरसीच्या पहिल्या यादीत नव्हती. ज्यांची नावं नाहीयत, ते सगळे घुसखोर आहेत असं विधान अमित शाह यांनी केलं होतं. पण त्यात अनेक बड्याबड्या आसामी लोकांचीच नावं नव्हती. या यादीवरुन बराच गदारोळ झाला. नंतर जेव्हा फायनल ड्राफ्ट आला तेव्हा ही संख्या १९ लाखावर आली. पण त्यातही बहुतांश हिंदूच असल्यानं तिथल्या स्थानिक भाजपच्या नेत्यांनीच त्याविरोधात नाराजी प्रकट केली. थोडक्यात काय तर बांगलादेशी मुस्लिमांना एनआरसीच्या माध्यमातून बाहेर काढण्याचा मुख्य हेतू असला तरी तो यशस्वी होऊ शकला नाही. बहुसंख्या हिंदूच घुसखोर ठरल्यानं त्याविरोधात ओरड सुरु झाली. सध्या जो नागरिकत्व कायदा आणला गेलाय, तो हेच अपयश लपवण्यासाठी. कारण मुस्लीम सोडून जे कुणी एनआरसीच्या यादीत नागरिक म्हणून अपात्र ठरणार होते, त्या सगळ्यांना हा नागरिकत्व कायदा एकप्रकारे संरक्षण देणारा आहे. एकंदरीत, केंद्र सरकारने केलेल्या कायद्यांना होत असलेला विरोध बघता सरकारने जन भावना देखील समजून घेतली पाहिजे.संसद चर्चेचे सर्वोच्च व्यासपीठ आहे.कायद्याच्या मसुद्यावर चर्चा करताना विरोधी पक्षांची बाजू देखील समजून घेतली पाहिजे.. सरकारने अनेक कायदे करताना घाई गर्दीने विधेयक पारित करून घेतले. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे लोकांनी देखील प्रत्येक कायद्याला विरोध करू नये.सरकारला कायदा करण्याचा अधिकार आहे.लोकांना कायद्याच्या विरोधात आंदोलन करण्याचा अधिकार आहे लोकशाहीत आंदोलन करण्याच्या अधिकाराबाबत सर्वोच्च न्यायालयाने गेल्या काही वर्षांत सातत्याने मत व्यक्त केले आहे. गेल्या वर्षी डिसेंबरमध्येही जंतरमंतरबाहेर निदर्शने करण्यावर बंदी घालण्यात आली होती, तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने ती उठवली होती. तेव्हा न्यायालयाने म्हटले होते की, नागरिकांच्या एकत्र येण्याचा आणि आंदोलन करण्याचा अधिकार पूर्णपणे रोखता येणार नाही.आंदोलनाचा अधिकार हा संविधानात आपल्या मूलभूत अधिकारांमध्ये समाविष्ट आहे, परंतु त्यासोबत एक अट अशी आहे की, तो शांततापूर्ण असावा आणि त्यामुळे सामान्य लोकांच्या आणि सरकारी यंत्रणेच्या कामकाजात अडथळा येऊ नये.

# नवीन तूर बाजारात, आवक वाढण्याआधीच भावात घसरण

## दहा हजार भाव मिळण्याची अपेक्षा भंग : शेतकऱ्यांची चिंता वाढली

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील खडसे**

**रिसोड :** यावर्षीच्या हंगामातील नवीन तूर बाजार समितीत येण्यास सुरुवात झाली आहे. मात्र आवक वाढण्याआधीच तुरीच्या भावात घसरण पहावयास मिळत आहे. रिसोड बाजार समितीत काल दि.३१ डिसेंबर रोजी अत्यल्प प्रमाणात तुरीची आवक असूनसुद्धा भाव केवळ सहा हजार ते साडे सात हजार रुपये प्रति क्विंटलच्या आसपास होते. गेल्या महिन्यातील दहा ते आकरा हजार रुपये प्रति क्विंटल असलेले भाव प्रचंड प्रमाणत घसरल्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. परिणामी यावर्षी किमान दहा हजार रुपये प्रति क्विंटल तूरीला भाव मिळेल अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती. मात्र सदर अपेक्षाभंग होण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. यावर्षी तुरीचे पीक पक्व होण्याच्या अवस्थेत असतानाच अचानक अवकाळी पावसाने थैमान घातले होते. त्यामुळे तुरीच्या पिकाला मोठा फटका बसला असून, आपसुकच उत्पन्नात कमालीची घट झाली आहे. काही भागात तर उत्पादन खर्च वसूल होने सुद्धा मुश्कील झाले आहे. पण ज्या पिकाच्या उत्पादनात घट होते त्या शेतमालाला चांगला भाव मिळतो हा शेतकऱ्यांचा आजवरचा अनुभव आहे. त्यामुळे यावर्षी तुरीला किमान दहा हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळेल अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती. परंतू सध्यस्थितीत हलक्या व मध्यम जमिनीतील तुरीचे पीक काढणीस आले असून सदर मालाची आवक बाजार समितीत येण्यास सुरुवात झाली आहे. काल दि.३१ डिसेंबर रोजी रिसोड बाजार समितीत जेमतेम शंभर क्विंटलच्या आसपास तुरीची आवक होती. तरीसुध्दा भावात घसरण पहावयास मिळाली. आणखी काही दिवसात जवळपास सर्वच शेतकऱ्यांचे तुरीचे पीक काढून तयार होणार आहे. त्यामुळे जानेवारी २०२४ च्या अखेर व फेब्रुवारी महिन्यात बाजार समितीत तूर पिकाची आवक वाढणार आहे. आणि आवक वाढली की भाव आणखीनच घसरतात हा सुद्धा शेतकऱ्यांचा नेहमीचा अनुभव आहे. त्याअनुषंगाने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. खरिप हंगामातील सोयाबीन उत्पादनात सुद्धा शेतकऱ्यांना घट सोसावी लागली आहे. तद्वतच सोयाबीनच्या भावात सुद्धा शेतकऱ्यांचा हिरमोड झाला आहे. आणि रब्बी हंगामातील गहू, हरभरा व इतर शेतमाल घरात येईपर्यंत कसलीच शाश्वती नाही. त्यामुळे सध्यस्थितीत कमी प्रमाणात का होईना पण हातात आलेल्या तुरीला किमान दहा हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळेल अशी अपेक्षा शेतकऱ्यांना लागली होती. मात्र आवक वाढण्याआधीच तुरीचे भाव घसरण्यास सुरुवात झाली आहे. परिणामी शेतकऱ्यांना आथिर्क बजेट कसे बसवायचे ? हा प्रश्न सतावत आहे.





माझी तीन एकरात तूर असून, मध्यंतरी आलेल्या ढगाळ वातावरणामुळे मोठ्या प्रमाणात आळ्यांचा प्रादुर्भाव झाला होता . महागडे कीटक नाशक औषधे फवारून सुद्धा आळ्यांनी तुरीचा पहिला बहर फस्त करुन टाकला आहे . आणि दुसऱ्या बहरातील जेमतेम शेंगा पक्व झाल्या आहेत . त्यामुळे तीन एकरात तीन पोते तूरी होतील कि नाही अशी परिस्थिती आहे . त्यातच भाव सुद्धा घसरत चालले आहेत . अशा बिकट परिस्थितीमुळे आथिर्क चिंता सतावत आहे . . ! **दिनेश एकनाथ मवाळ, ( शेतकरी, महागाव ता .रिसोड )**

**हमीभाव केवळ कागदावरच :** शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव मिळणार अशी 2018 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात घोषणा करण्यात आली होती . जणेकरून उत्पादन खर्च अधिक त्या खर्चाच्या पन्नास टक्के नफा हमीभावातून शेतकऱ्यांना मिळेल हा त्यामागचा उद्देश होता . मात्र अद्याप पर्यंत तरी कुठल्याच बाजार समितीत हमीभाव ही प्रणाली काटेकोरपणे पाळल्यागेली असल्याचे एकही उदाहरण शोधूनही सापडणार नाही . त्यामुळे सरकारकडून जाहीर करण्यात आलेली हमीभावाची घोषणा केवळ कागदावरच असल्याचे यानिमित्ताने स्पष्ट होत आहे .

# ट्रक चालकांच्या संपाला भाकपचा पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपति संभाजी नगर :** भारतीय जनता पक्षाच्या केंद्रातील सरकारने आणलेल्या नवीन मोटार वाहन कायद्यातील जाचक तरतुदींविरोधात पुकारण्यात आलेल्या ट्रक-टॅंकर चालकांच्या संपाला भारतीय कम्युनिस्ट पक्षाने पाठींबा जाहीर केला आहे. समृद्धी महामार्गासारखे जीवघेण्या महामार्गावर एकटे वाहन उलथुन अपघात होतात तेव्हा सरकारवर कोणता गुन्हा दाखल करायचा असा सवालही भाकपने केला आहे. भारतीय जनता पक्षाने महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, जातीयवाद, धर्मांधता वाढवणारी धोरणे राबवल्यामुळे देश अराजकतेकडे वाटचाल करीत आहे. घटनेची पायमल्ली करुन जाचक कायदे पास करण्याचा सपाटा भारतीय जनता पक्षाच्या केद्र सरकारने लावला आहे.ट्रक-टॅंकर चालकांशी चर्चा न करता त्यांच्या विरोधात 10 वर्षाची शिक्षा, जबर दंड ऑनलाईन फाईन इत्यादी जाचक तरतुदींमुळे वाहन चालकांमध्ये सरकार बाबत नाराजी निर्माण झाली असुन निवडणुकीच्या तोंडावर असे आंदोलन सरकारला परवडणारे नाही. वाहन चालकांना हिट ॲण्ड रन केसमध्ये 10 वर्षाची शिक्षा आणि जबर दंड आणि सरकारच्या चुकांमुळे दोष असलेले रस्ते, महामार्गावर होणारे अपघात आणि मृत्युंना जबाबदार असणाऱ्या प्रधानमंत्री आणि त्यांचे मंत्री ,खासदार यांना कोणत्या शिक्षेची तरतुद आहे असा सवालही भारतीय कम्युनिस्ट पक्षाने केला आहे. प्रफिद्धिपत्रकावर राज्य कार्यकारिणी सदस्य कॉ. ॲड अभय टाकसाळ, शहर सहसचिव कॉ जॅक्सन फर्णांडीस, कॉ. अनिता हिवराळे, काॅ. विकास गायकवाड, कॉ. राजु हिवराळे, कॉ. रफीक बक्श, कॉ. माधुरी जमधडे इत्यादींच्या सह्या आहेत.

# बोडखा येथील 'त्या' माकडाला केले अखेर जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे बोडखा येथे अनेक दिवसांपासून एका माकडाने गावकऱ्यांना बेजार परेशान केले होते यासंदर्भात गावकऱ्यांनी वनविभागाकडे तक्रार केली होती तर याची माहिती व पुर्व पाहणी विभागाच्या अधिकारी कर्मचारी यांनी करून नियोजन केले होते आखेर त्याला जेरबंद करण्यात आले व गावकऱ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

आज दि.०३ बोडखा येथे गावात काही दिवसापासुन गावकर्यांना त्रास देणारा एका माकडाला पिंजरा लावुन पकडण्यात आले यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी खुलताबाद व वनपरीमंडळ अधिकारी पळसवाडी यांच्या मार्गर्शनाखाली सी. ए. खरात वनरक्षक लोणी. भाऊसाहेब चव्हाण वनमजूर, बारगळ मामा सरपंच रफीक पटेल, ग्रामपंचायत सदस्य, तंटामुक्ती अध्यक्ष, गावकरी उपस्थीत होते.






धुळे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुभाष देवरे यांच्या सुनबाई व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे निकटवर्तीय नवसारी ( गुजरात ) मतदार संघातील खा. सी.आर. पाटील यांच्या सुकन्या तसेच भारतीय जनता पार्टीच्या सदस्या सौ.धरती देवरे यांची धुळे जिल्हा परिषद अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. अश्विनी पाटील यांनी राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या अध्यक्ष पदासाठी बुधवारी निवडणूक पार पडली त्यात सौ.धरती देवरे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

# रामजी (बापू) भिसे यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**उस्माननगर :** येथील साठेनगरतील जुन्या पिढीतील कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक आणि पूर्णा सहकारी साखर कारखान्याचे कर्मचारी शिवाजी भिसे यांचे वडील रामजी ( बापू ) नारायण भिसे यांचे राहत्या घरी वयाच्या ८० व्या वर्षी वृध्दापकाळाने निधन झाले. रामजी भिसे हे मनमिळाऊ स्वभावाचे विचारप्रिय नागरिक म्हणून समाजात वावरत होते. दि.२ जानेवारी रोजी रात्री साडे दहा वाजता घरी वृध्दापकाळाने निधन झाले. बुधवारी दुपारी येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन, मुलं, चार मुली, नातू, पणतू असा परिवार आहे. दैनिक साहित्य सम्राटचे लोहा तालुका प्रतिनिधी शिवराज दाढेल यांचे आजोबा होत.

# व्यंकटेश निवासी मूकबधीर विद्यालय येथे सावित्रीबाई फुले जयंती



आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** येथील व्यंकटेश निवासी मूकबधिर विद्यालय धर्माबाद येथे भारताच्या पहिल्या मुख्याध्यापिका, स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, क्रांती ज्योती सावित्री बाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महात्मा ज्योतिबा फुले यांची वेशभूषा शाळेचा विद्यार्थी चंद्रशेखर मंडगे, तसेच सावित्री बई ची वेशभुषा शाळेच्या विद्यार्थिनी कु.श्रुती महेश जोशी व कू. प्रतीक्षा प्रकाश झुंजारे यांनी साकारली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे मु.अ.श्री डी.डी जोशी, श्रीमती शोभा जोशी, सावळे आर. एस., चवरे डी. बी., उमाटे एन. व्ही., तेलंग एस. जे. नारसुने आर. व्ही, कांठाले डी डी, शेख एस बी यांनी परिश्रम घेतले. शाळेचे मुख्याध्यापक यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

# वंदे भारत एक्सप्रेसची पायलट गावची कन्या झाली

आधुनिक केसरी न्यूज



**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** जालना मुंबईसाठी ३० डिसेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वंदे भारत एक्सप्रेसचा उद्घाटन सोहळा पार पडला. वंदे भारत एक्सप्रेसची सहायक लोको पायलट होण्याचा मान छत्रपती संभाजी नगरच्या फुलंब्री तालुक्यात असलेल्या पाल येथील कल्पना मदनसिंग धनावत हिला मिळाला आहे.तालुक्यातील पाल हे मुळगाव असलेली कल्पना धनायत (राजपूत) रेल्वेच्या वंदे भारत एक्सप्रेसमध्ये सहाय्यक लोको पायलट म्हणून कार्यरत आहे. विशेष म्हणजे, शनिवारी धावणाऱ्या मराठवाड्यातील पहिल्या जालना ते मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचे सारथ्य कल्पना करणार आहे. स्वतःच्या शहरात लोको पायलट म्हणून सारथ्य करत येणाऱ्या कल्पनाचे कौतुक होत आहे. मदनसिंग धनायत हे मुळचे तालुक्यातील पाल येथील रहिवासी. पाल येथील न्यू हायस्कूलमध्ये शिक्षणानंतर एसटी महामंडळात नौकरी लागल्याने धनायत छत्रपती संभाजीनगर शहरात राहण्यास गेले. ते एसटी महामंडळात तिकीट तपासनीस होते. मुलगी कल्पना हिने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून इलेक्ट्रिकल इंजिनिअर अँड पॉवर ही पदवी २०१६ मध्ये मिळविली. त्यानंतर २०१९ मध्ये रेल्वे विभागात तिची लोको पायलट म्हणून निवड झाली. दरम्यान, मराठवाड्यातील पहिल्या वंदे भारत एक्स्प्रेस रेल्वेची गुरुवारी छत्रपती संभाजीनगर ते मनमाड यशस्वी चाचणी पार पडली. याबद्दल कल्पनाचे वडील म्हणाले की कल्पना ही लहानपणापासूनच अत्यंत हुशार होती. तिने शालेय जीवन असो किंवा महाविद्यालय असो यामध्ये चांगली कामगिरी केली. जिद्द, चिकाटी आणि सातत्याच्या जोरावर तिने रेल्वेची परीक्षा उत्तीर्ण केली. आज ती मराठवाड्याच्या महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेस साठी सहायक लोको पायलट म्हणून काम करणार आहे. याबद्दल ती माझी लेक असल्याचा मला अभिमान वाटतो असे तिचे वडील मदनसिंग धनावत अभिमानाने सांगतात.



# पंचायत समिती कार्यालयसमोर अतिक्रमण; बोगस नमुना ८ विरोधात आमरण उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मावसाळा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची संरक्षण भिंत तोडून आत अतिक्रमण केले ते हटविण्यासाठी व बोगस नमुना नंबर आठ करुन त्याद्वारे रजिस्टरी केली ते रद्द करण्यासाठी दि.०२ पंचायत समिती कार्यालय खुलताबाद येथे समोर आमरण उपोषण सुरु करण्यात आले आहे. ज्योती बाळु घाटे या महिले सह मावसाळा येथील बौद्ध समाजांचे नागरिक आमरणउपोषण बसले आहे.गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची संरक्षण भिंत तोडून आत अतिक्रमण केले ते हटवणे, ती संरक्षण भिंत पुर्वी सारखी उभारुन देणे,बोगस नमुना नंबर आठ व त्यांवरून केलेली रजिस्टरी रद्द करणे, अनेक वेळा त्या बद्दल तक्रार द्वारे अवगत करुनही कारवाई न केल्या बद्दल कारवाई करणे, बोगस नमुना नंबर आठ व त्यांवरून केलेली रजिस्टरी ची नोंद ज्या सरपंच ग्रामसेवक च्या काळात झाली त्यांच्या विरुद्ध कारवाई करणे, बोगस नमुना नंबर आठ अतिक्रमणला पाठिंबा व कारवाईत चालढकल करणाऱ्या ग्रामसेवक चौकशी तथा बदली करण्यात यावी असे नमुद करण्यात आले आहे.वरील प्रकरणी तातडीने चौकशी व कारवाई या साठी आमरणउपोषण सुरु करण्यात आले आहे.

# अभिनव बाल विकास मंदिर विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



आधुनिक केसरी न्यूज

**कळवण :** मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक संस्थेच्या अभिनव बालविकास मंदिर बेज विद्यालयात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली तसेच बालिका दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक तुषार चव्हाण सर होते. व्यासपीठावर सर्व शिक्षक शिक्षिका व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. जयंती निमित्त विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. ज्यु. के.जी. ते इ ४ लीच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उस्फुर्त सहभाग घेतला व भाषणे,कविता गाणी सादर केलीत तसेच बालिका दिनानिमित्त विद्यालयात वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती विद्यार्थ्यांनी सुंदर वेशभूषा धारण केल्या होत्या. विद्यालयाच्या उपशिक्षिका निकम मॅडम यांनी सावित्रीबाई फुले यांच्याविषयी मनोगत व्यक्त केले तसेच उपशिक्षिका शिंदे मॅडम यांनी स्वरचित कविता सादर करून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. अध्यक्षीय मनोगतात विद्यालयाचे मुख्याध्यापक चव्हाण सर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी सखोल मार्गदर्शन केले व बालिका दिनाचे मुख्य उद्दिष्ट व महत्व समजून सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन निकम मॅडम यांनी केले तसेच आभार जाधव मॅडम यांनी मानले कार्यक्रम यशस्वीसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# महावितरण व पारेषण भरती प्रक्रियेच्या निर्णयाची केली होळी

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** महावितरण व महापारेषण वीज कंपन्यांत १५ ते २० वर्ष अनुभवी वीज कंत्राटी कामगारांना आरक्षण व वयात सवलत न देताच प्रशासनाने भरती प्रक्रिया राबवण्यास सुरूवात केली आहे. महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ (संलग्न भारतीय मजदूर संघ) या साठी डिसेंबर २०१४ पासून तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व तत्कालीन ऊर्जामंत्री मा.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कडे वीज कामगार महासंघाचे अध्यक्ष अण्णाजी देसाई व कोथरुडच्या आमदार .प्रा. डॉ.मेधाताई कुलकर्णी यांच्या पाठपुराव्याने तत्कालीन ऊर्जामंत्री मा.चंद्रशेखर बावनकुळे यांनी २२ एप्रिल २०१५ रोजी कंत्राटदार विरहित नॉमिनल मस्टर रोल (एनएमआर ) पद्धती साठी समिती स्थापन करण्याची घोषणा केली.या मनोज रानडे समितीचा अहवाल आला यात कंत्राटदार विरहित रोजगार व आरक्षण देण्याची शिफारस केली. ४ जानेवारी २०२३ रोजी खाजगीकरणा च्या पार्श्वभूमीवर सह्याद्री शासकीय निवास स्थानी झालेल्या बैठकीत उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री फडणवीस यांनी कंत्राटी कामगारांना वयात सवलत देण्याचे मान्य केले. कंत्राटी कामगार संघाची बैठक घेऊ असे आश्वासन दिले मात्र सरकार स्थापने पासून एकही मिटिंग घेतली नसल्याने समस्यां वाढल्या आहेत. त्यांनी केलेल्या सूचनेला केराची टोपली दाखवत वीज कंपनी प्रशासनाने या कंत्राटी कामगारांच्या पाठीत खंजिर खुपसल्याची भावना सर्व कष्टकरी कंत्राटी कामगार विश्वात झाली आहे. कोरोना काळात जीवाची पर्वा व तमा न बाळगता अखंडित वीज पुरावठा करतांना शेकडो कंत्राटी कामगार मृत्यु मुखी पडले, अनेक जण अपंग झाले.



# महात्मा फुले विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**कळवण :** मराठा विद्या प्रसारक समाज संचलित महात्मा फुले हायस्कूल व उच्च माध्यमिक विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती बालिका दिन म्हणून साजरी करण्यात आली. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य श्री पांडुरंग पुंजाजी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.व द्वीप प्रज्वलन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम.अहिरे व्ही. आर व सर्व सेवकांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान श्री पांडुरंग पुंजाजी पाटील यांनी स्वीकारले. विद्यालयाच्या विद्यार्थिनी कुमारी चैताली शेवाळे व तनुजा शेवाळे यांनी सावित्रीबाई फुले यांची भूमिका केली. रिया निकम, मोनिका गांगुर्डे ,अनुष्का शेवाळे, चैताली शेवाळे ,गायत्री पवार, आरती पवार, रुचिता जोपले, स्नेहल खैरनार, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर तनुजा शेवाळे हिने एकपात्री नाटीका सादर केली. विद्यालयाच्या उपशिक्षिका शिरसाठ ए. आर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची ओळख करून दिली.विद्यालयाच्या मुख्याध्यापिका यांनी आपल्या भाषणात सावित्रीबाईंचे आचार, विचार आपल्या अंगी बाळगावेत. अन्यायाविरुद्ध लढा द्या असे सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवार जे.यु यांनी तर आभार प्रदर्शन गायकवाड एम. एम यांनी मांडले कार्यक्रमास पालक, सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# सिनेअभिनेता विजय मानवतकर यांना राजमुद्रा शिवसन्मान पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** सिने अभिनेता विजय मानवतकर यांना राजमुद्रा शिवसन्मान मानचिन्ह पुरस्कार माझा सिंधुदुर्ग सन्मान सोहळा कुडाळ 2023 या कार्यक्रमाचे संमेलनाध्यक्षपदी महेश कुंटे उदघाटक देव सर प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध अभिनेते अभय खडपकर सुप्रसिध्द अभिनेते विश्वजित फड़ते सुप्रसिध्द अभिनेत्री राजेश्री काळे सुप्रसिद्ध अभिनेते विजय मानवतकर होते विजय मानवतकर यांनी अनेक हिन्दी मराठी भोजपुरी चित्रपटातुन खलनायक भुमिका तसेच टि व्ही मालीका मधुन जनतेचे मनोरंजन केले आहे तसेच भारत भ्रमणा मधे सवत्र आपल्या अभिनय पथनाट्य गायणातुन राष्ट्रहिता चे प्रोबोधन केले भारतीय संस्कृती कलेतुन प्रदेशा मधे साजरीकरन केले या सर्व कार्याचे दखल घेऊन त्यांना राजमुद्रा शिवसन्मान पुरस्कार मानचिन्ह प्रदान करुण त्यांचा सन्मान करण्यात आला तसेच संयोजक कुसम केतकर आर एस राठोड तसेच स्वागध्यक्ष व निमंत्रक प्रा डॉ बिन एन खरात संचालक समृद्धी प्रकाशन सिंधुदुर्ग संस्थापक अध्यक्ष हुमन राईट प्रेस पब्लिकेशन कंपनी या कार्यक्रमा मधे अनेक मान्यवराना त्यांनी केलेल्या सुकार्या साठी सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आले कार्यक्रमात मोठ्या संख्येत जनसमुदाय उपस्थित होता कार्यकमाचे स्थळ मराठा समाज मंदीर सिंधुदुर्ग कुडाळ होते.





# फुले विद्यालयातील मुलींची सूर्यनमस्कार स्पर्धेसाठी निवड

## स्पर्धा ३ फेब्रुवारी रोजी अंबड येथे होणार

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** तालुक्यातील पानेवाडी येथील महात्मा फुले विद्यालयात (दि. 01) सोमवार रोजी श्री देवा चित्राल यांनी विद्यालयातील पाचवी ते बारावीच्या 383 मुलींची सूर्यनमस्कार स्पर्धा घेऊन त्यातील सोळा मुलींची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. निवड झालेल्या मुलींची राज्यस्तरावरील स्पर्धा दिनांक 03 फेब्रुवारी 2024 शनिवारी अंबड येथे होणार आहे. स्पर्धेसाठी अमृता अवघड, दिपाली गिऱ्हे, अमृता जाधव, सोनाली कोरडे, गायत्री मापारे, ऋतुजा मापारे, भक्ती येवले, अश्विनी जाधव, कोमल मोहिते, भाग्यश्री उबाळे, वर्षा भुतेकर, भक्ती रांजणे, सोनाली कदम, शिरीन बेग, शिफा बेग, निता तिडके या सोळा मुलींची निवड करण्यात आली. निवड झालेल्या मुलींचे संस्थेचे संस्थापक सचिव श्री. आत्मारामजी तिडके, मुख्याध्यापक श्री. ए. ए. तिडके, पर्यवेक्षक श्री. एस. एस. गोसावी व शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# महिला आत्मनिर्भर व सबलीकरणासाठी वैजापुरात कोंबडीची ६२५पिल्ले वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** देशाच्या ग्रामीण भागातील महिला आत्मनिर्भर तर देश आत्मनिर्भर"महिलांच्या सबलीकरणानेच देश सबल होईल यास्तव महिलांना विविध उद्योगासाठी भाग भांडवल उपलब्ध करुन देणे व त्यांच्या आत्मनिर्भर साठी सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यावा असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते व निर्मला इन्स्टिट्यूट या सामाजिक संस्थेचे मार्गदर्शक सल्लागार धोंडीरामसिंह राजपूत यांनी ग्रामीण भागातील महिलांना ६२५कोंबडीची पिल्ले वाटप प्रसंगी मंगळवार(ता,०२) रोजी केले,सामाजिक संस्था निर्मला इन्स्टिट्यूटच्या वतीने तालुक्यातील बोरसर,बेलगाव,भायगाव, बिलोणी, रोटेगाव येथील महिला बचत गट याना ६२५कोंबडी पिल्ले वाटण्यात आली,संस्थेच्या प्रमुख नॅन्सी रोद्रीग्ज,मार्गारिट,व छाया बंगाळ यांची या प्रसंगी उपस्थिती होती,महिला आत्मनिर्भरतेसाठी बंगलोर च्या किरण गार्डनर यांनी आर्थिक हातभार लावला,निर्मला इन्स्टिट्यूट मार्फत मागच्या वर्षी ही कोंबडीची पिल्ले वाटप करण्यात आली ते कुटुंब आत्मनिर्भर झाले.



# आश्रमशाळेतील विद्यार्थिनींना अन्नातून विषबाधा

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** इगतपुरीतील मुलींच्या शासकीय वसतिगृहातील सहा विद्यार्थिनींना अन्नातून विषबाधा झाल्याने त्यांना इगतपुरी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर मंगळवारी त्यांना रुग्णालयातून सोडण्यात आले.

इगतपुरी येथील धम्मगिरी परिसराजवळ मुलींचे शासकीय वसतिगृह आहे. या वसतिगृहातील सहा मुलींना ३१ डिसेंबर रोजी काही खाल्ल्यामुळे अन्नातून विषबाधा झाली. त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने इगतपुरी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. या विषयी इगतपुरी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी इंगोळे यांनी माहिती दिली.विषबाधा झालेल्या विद्यार्थिनी वसतिगृहातील एकाच खोलीतील आहेत. अन्य मुलींना हा त्रास झालेला नाही. राधा कामडी (१३), मनिषा गांडाळ (१५), प्रियंका गिलोंदे (२१), मनिषा केकी (१८), नीता करवंदे (१८) आणि नेहा खोरघडे (१४) यांनी बाहेरून श्रीखंड, पुरी वा अन्य काही दुग्धजन्य पदार्थ खाल्ल्याने त्यांना त्रास झाला. मंगळवारी त्यांना रुग्णालयातून सोडण्यात आले.



# सेवापूर्तीनिमित्त निरोप समारंभ कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील शिवाजी विद्यालयाच्या वतीने मध्यवर्ती सहकार बॅंकचे कॅशीअर नामदेव चव्हाण यांचा सेवापूर्ती निमित्त निरोप समारंभ कार्यक्रम दि.२/१/२४ मंगळवार रोजी शिवाजी विद्यालयात मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. मंगळवार सत्कार समारंभाचे आयोजन प्राचार्य पंजाबराव कोलते पाटील यांच्या वतीने शिक्षकवृंद यांच्या हस्ते करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य पंजाबराव कोलते पाटील व शाळेचे अध्यक्ष भाऊराव कोलते पाटील उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन सत्कारमूर्ती नामदेव चव्हाण व पत्नी सावित्राबाई नामदेव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. आणि पुढील कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षांच्या हस्ते सेवानिवृत्त कॅशीअर नामदेव मानसिंग चव्हाण व पत्नी सावित्रीबाई यांचा यथोचित सत्कार करून पुष्पगुच्छ देऊन गौरव करून त्यांना भेटवस्तू देण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या सत्कारमूर्ती नामदेव चव्हाण यांचा प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी जीवन परिचय करून दिला तर प्रा.विजयसिंग राजपूत यांनी मनोगत व्यक्त करताना सेवानिवृत्ती सत्कार मूर्ती नामदेव चव्हाण यांच्या शिस्तबद्ध बॅंकेच्या कामकाज शैली, मितभाषी कामासाठी सदैव तत्पर असल्याबाबतचे अनुभव काळे यांनी सांगितले.तद्नतंर उपस्थित सर्व शिक्षकवृंद,पाहुण्यांचे सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी सत्कारमूर्ती नामदेव चव्हाण व पत्नी सावित्राबाई नामदेव चव्हाण यांना गहिवरून आपल्या कार्यकाळा दरम्यान विविध व सावळदबारा परिसरातील सहकार्य लाभल्यास्तव भावपूर्ण शब्दांत सर्वांचे त्यांनी आभार व्यक्त केले.याप्रसंगी प्रा जीवन कोलते पाटील,विजयसिंग राजपूत, भास्कर खमाट, ज्ञानेश्वर राठोड, पोपटराव सोनवणे,श्याम जाधव, पत्रकार बंन्धू शाखेचे कर्मचारी प्रदीप रोकडे, रत्नाकर उंबरे,ओम भुगुले, धनराज गवळे, प्रदीप पाटील व जिल्हा मध्यवर्ती बॅंकेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सत्कार समारंभाच्या वेळी उपस्थित होते.

# आपला संकल्प विकसित भारत रथयात्रेचा

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथे आपला संकल्प विकसित भारत या योजनेअंतर्गत ते रात्रीचे स्वागत करण्यात आले. यावेळी केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती यावेळी देण्यात आली मोदी सरकारची हमी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे छायाचित्र असलेली एक दिग्दर्शिका ग्रामस्थांना वाटप करण्यात आली यावेळी उपसरपंच गोपाळ वाघ सरपंच पती सबेर पठाण, सोसायटी चेअरमन कडूबा म्हस्के, ग्राम विकास अधिकारी रामदास पाथरे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. काथार मॅडम, फार्मसिस्ट जमील शेख, सोसायटी सदस्य सलीम सोदागर ग्रामपंचायत सदस्य बाबूराव मंदाडे, आशा सेविका सुनीता मगरे , अनिता बिलघे, सुनीता बारुटे, ग्रामपंचायत कर्मचारी सुमित्रा दणके, ग्रामस्थ साहेबराव खाकरे, सोमनाथ खाकरे, शेख अंजुम, धीरज कोलते, बबन मंदडे रमेश वाघ, भीमराव म्हस्के, ऑपरेटर बोडखे, प्रदीप पाटणी, नाशिकराव शिंगारे प्रफुल व्यवहारे ,भाऊसाहेब शिनगारे मनोज वाघ कृष्णाने कृष्णा सहाने रेश्माजी वाणी बाळू मंदाडे ग्रामस्थ व महिला यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते केंद्र शासनाने सुरू केलेल्या विविध योजनांची माहिती यावेळी देण्यात आली व ग्रामस्थांना दिग्दर्शिका वाटप करण्यात आल्या ग्रामस्थांच्या वतीने संकल्प भारत विकसित भारत या रथयात्रेचे स्वागत करण्यात आले.



# केंद्राने नव्याने केलेला काळा वाहन कायदा परत घ्या; राष्ट्रपतींना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** केंद्राने नव्याने केलेला काळा वाहन कायदा परत घ्या नसता केंद्र शासनास सळो की पळो करून सोडत असा इशाराच राष्ट्रपतींना तहसीलदार यांच्या मार्फत शिवसेना उबाठा चे जिल्हा संघटक प्रा. डॉ.गोपाल बशिरे (बच्छिरे)यांनी दिला.

केंद्र सरकारने राज्यघटनेतील वाहन कायदा बदलून काळा वाहन कायदा आणला आहे यामध्ये, एखाद्या चालकाच्या हाताने कळत नकळत अपघात घडला व त्याने अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीला सोडून निघून गेला तर त्यास दहा वर्षाची कैद व दहा लाख रुपये दंड, त्यानंतर जर त्याने अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीला मदत केली व त्यास दवाखान्यापर्यंत पोहोचवलं तर पाच लाखाचा दंड व पाच वर्षाची शिक्षा असा हा काळा कायदा केंद्र शासनाने केला आहे. या माध्यमाने चालकाचा वेगळा विमा उतरवून त्यास आर्थिक भुर्दंड देऊन आपल्या मित्रांच्या विमा कंपन्या बलाढ्य करण्याचा हा कट आहे. चालक याच्या हातून नकळत कुठलाही अपघात घडला व तो त्या जखमी अपघातग्रस्ताला दवाखान्यात नेण्यासाठी थांबला तर त्या परिसरातील लोक त्या ट्रक चालकाला मरेपर्यंत मारण्याचा प्रयत्न करतात व याची हजारो उदाहरणे आहेत, जमावाने ट्रक चालकाला ठेचून ठेचून मारले असे असताना सुद्धा केंद्र सरकार असा काळा कायदा जो कायदा इंग्रजांनी सुद्धा कधी केला नाही त्याहीपेक्षाही वाईट काळा कायदा हा केंद्र सरकारने आणला आहे. त्यामुळे जो चालक बिचारा महिना महिना, दोन दोन महिने, आपल्या परिवारापासून दूर राहून देशाची सेवा करतो




सामान्य माणसापर्यंत गरजेच्या वस्तू पोहोचवतो त्या देशभक्त सैनिकाला तयार केलेल्या काळ्या वाहन कायद्यात अडकवणे हे अमानवीय आहे. राज्यघटनेत वाहन कायदा आहे त्याच कायद्याला कायम ठेवावे व केंद्र शासनाने नव्याने आणलेला काळा वाहन कायदा हा रद्द बादल करावा किंवा परत घ्यावा अन्यथा संपूर्ण भारताची जीवन वाहिनी ही बंद होईल व याचा फटका सर्वसामान्य गोरगरिबाला बसेल केंद्र शासनाने आणलेला नवा काळा वाहन कायदा हा रद्द करण्याचा निर्णय घ्यावा अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व महाविकास आघाडी यांच्या माध्यमातून संपूर्ण देशभर तीव्र आंदोलन करून केंद्र शासनास सळोकी पळो करून सोडूत असा इशाराच शिवसेना उबाठा चे जिल्हा संघटक डॉ गोपाल बशिरे तालुकाप्रमुख एड दीपक मापारी, शहर प्रमुख गजानन जाधव सर, यांनी तहसीलदार मार्फत राष्ट्रपतींना दिला याप्रसंगी तानाजी अंभोरे, एकबाल कुरेशी, नंदकिशोर राठोड, परसराम राठोड, किरण कमडे, मच्छिंद्र अंभोरे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# शिक्षक सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी पदासारखे काम करावे

## मा.आ. रोहिदास चव्हाण यांच्या हस्ते शिक्षक सेनेच्या पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शिक्षक सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी पदासारखे काम करावे असे प्रतिपादन शिवसेनेचे माजी आमदार तथा शिवसेना लातूर जिल्हा संपर्क प्रमुख रोहिदास चव्हाण यांनी लोहा येथे शिवसेना प्रणित शिक्षक सेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती पत्र वाटप कार्यक्रमात केले.

यावेळी शिक्षक सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण, जिल्हाध्यक्ष संतोष अंबुलगेकर जिल्हा उपाध्यक्ष बालाजी भांगे सर तालुकाध्यक्ष संभाजी पवार आदी उपस्थित होते. पुढे बोलताना माजी आमदार रोहिदास चव्हाण म्हणाले की, शिक्षक सेनेचे कार्य चांगले आहे शिक्षकांच्या नायहक्कासाठी निर्भिडपणे लढा देण्यासाठी शिक्षकांच्या पाठीमागे शिक्षक सेना खंबीरपणे ऊभे आसते आज शिक्षक सेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या होत आहेत त्यांना मी शुभेच्छा देतो, असे माजी आमदार रोहिदास चव्हाण म्हणाले.
तसेच यावेळी माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी शिक्षक सेनेच्या पदाधिकाऱ्याना नियुक्त्या केलेले पत्र दिले ते पुढीलप्रमाणे तालुकाध्यक्ष संभाजी पवार, तालुका सल्लागार नागेश स्वामी, तालुका उपाध्यक्ष बंडप्पा स्वामी, महिला उपाध्यक्ष सौ. संगीता राठोड, तालुका सरचिटणीस संग्राम चिंचोरे, तालुका संघटक रमेश नादरगे, तालुका संपर्क प्रमुख लहू पंदलवाड, तालुका सल्लागार बालाजी बनसोडे, तालुका सहसचिव राहुल बनसोडे, तालुका संघटक दशरथ मेकाले, तालुका उपाध्यक्ष वाय पी कुलकर्णी, तालुका संघटक केशव चव्हाण, तालुका सहसंघटक बी.जी. वाघमारे, तालुका उपाध्यक्ष जी एम सापनर, तालुका प्रसिद्धी प्रमुख संतोष घाटकार, तालुका महिला संघटक सौ. हेमा जोशी
तसेच यावेळी शिक्षक सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण, जिल्हध्यक्ष संतोष अंबुलगेकर



सर यांनी ही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात पदोन्नत मुअ.पदी श्री पांडूरंग मुंडे व नेट सेट ऊतीर्ण माधव धोंडगे यांचा सत्कार मा.आ.रोहीदास चव्हाण केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काशिनाथ शिरसीकर यांनी केले तर आभार भांगे सर यांनी मानले. नबलवार डी.डी, मोमीन सरसह असंख्य शिक्षक ऊपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक सेनेचे तालुकाध्यक्ष संभाजी पवार यांनी परिश्रम घेतले.



# नेवपूर शाळेत बालिका दिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन गुरव**

**चिंचोली लिंबाजी :** कन्नड तालुक्यातील करंजखेड केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नेवपूर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिन बालिका दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला याप्रसंगी शाळेतील विद्यार्थिनींनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यासह भारतातील वेगवेगळ्या कर्तबगार महिलांची वेशभूषा परिधान करून गावातील प्रभात फेरी द्वारे लोकांची मने जिंकली. प्रभात फेरीदरम्यान स्त्री साक्षरता, बेटी बचाव बेटी पढाव, स्त्री पुरुष समानता, सर्वांसाठी शिक्षण, सारे शिकूया पुढे जाऊया अश्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. प्रभात फेरीनंतर छोटेखानी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेतील शिक्षिका सरस्वती जारीकोटे होत्या त्यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले व त्यानंतर शाळेतील चिमुकल्यांनी बालिका दिनानिमित्त कविता, गीते, भाषणे अत्यंत आनंदाने उत्साहाने सादर केली. शाळेतील सहशिक्षक शिवनाथ वाढेकर यांनी सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य याविषयी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आठवीची विद्यार्थिनी राजनंदिनी सोळुंके हीने केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रवीण जैस्वाल यांनी मानले याप्रसंगी मुख्याध्यापक रमेश बळे शिक्षक लक्ष्मण लेंडे ,राहुल देशमुख ,अरुण फड सह सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

# वैजापुरात जेष्ठ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी व आरोग्य सल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील आनंद मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, जायंट्स ग्रुप ऑफ वैजापूर सहेली यांच्या संयुक्त विद्यमाने व वैजीनाथ जेष्ठ नागरिक सेवा संघ,आधार जेष्ठ नागरिक संघ,चैतन्य जेष्ठ नागरिक सेवा संघ व उत्कर्ष जेष्ठ नागरिक महिला संघ यांच्या सहकार्याने मंगळवार( ता. ०२ )रोजी शहर व तालुक्यातील जेष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिरात जेष्ठ नागरिकांची सर्व प्रकारची आरोग्य मोफत स्वरूपात तपासणी करून त्यांना योग्य सल्लाही तज्ञ डॉक्टरांनी तपासून दिला. कार्यक्रम अध्यक्ष स्थानी जायंट्स ग्रुप च्या अध्यक्षा विद्याताई चापानेरकर होत्या. तर प्रमुख पाहुणे डॉ. अमोल अन्नदाते, डॉ.एस. एम, जोशी, डॉ.व्ही. जी. शिंदे, तसेच चारही जेष्ठ नागरिक संघचे अध्यक्ष प्रकाश शेठ बोथरा,अण्णासाहेब शेळके, प्रा.पी.एम. शिंदे व सौ, अंजली जोशी यांच्या सह डॉ. अरविंद अन्नदाते, सौ.आनंदी अन्नदाते,मेजर सुभाष संचेती, जाएन्ट्स सदस्या डॉ. कविता शेळके यांची उपस्थिती होती. कार्यक्रम प्रास्ताविक अंजली ताई जोशी यांनी केले व गेल्या २५ वर्षांपासून जाएन्ट्स च्या सामाजिक, शैक्षणिक,दिव्यांग क्षेत्रातील कामाचा आढावा सादर केला, डॉ.एस.एम. जोशी व डॉ,अमोल अन्नदाते, सौ आनंदी अन्नदाते यांनी उपस्थित जेष्ठ नागरिकाना आरोग्य बाबत,व जिवनमान बाबत मार्गदर्शन केले. सूत्र संचलन धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले आभार संतोषी भालेराव यांनी मानले. या प्रसंगी जाएन्ट्स च्या अलका साखरे अनघा आंबेकर,उपाध्यक्ष सुनीता साखरे,वैशाली साखरे,सचिव चंदा लहामंगे, कोषाध्यक्ष रत्नमाला कुलकर्णी,ईला पालेजा,साक्षी मुगदीया, दर्शना मुगदिया,यंग सहेली च्या सचिव भक्ती जाधव,जेष्ठ नागरिक उत्तमराव साळुंके, बबनराव क्षीरसागर,कृष्णा कांबळे,श्री शेटे, संतोषी भालेराव,संगीता भालेराव यांची उपस्थिती होती,नंतर आनंद हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी जेष्ठ नागरिकांची मोफत तपासणी केली व मार्गदर्शन ही केले.



# बाबुराव पाटील यांना पत्रकारिता पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** येथील सकाळ चे ज्येष्ठ बातमीदार बाबुराव पाटील यांना कंधार येथील (कै.) दूर्गादास सराफ प्रतिष्ठान व हिंदवी बाणा परिवार चा लोकमान्य टिळक पत्रकारिता पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.
मागील तीस वर्षांपासून बाबुराव पाटील वृतपत्र क्षेत्रात काम करीत असून विविध विधायक बातम्याना प्राधान्य देवून उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आपली लेखनी झिजवली. याची दखल घेवून यापूर्वी राज्य, मराठवाडा, जिल्हा, तालुका स्तरावर पूरस्कार मिळाले आहेत. केवळ पत्रकारीताच नव्हे तर चित्रकार, नाट्य, तबला वादक म्हणून वेगळी ओळख निर्माण केली आहे. कंधार येथील कै.दूर्गादास सराफा प्रतिष्ठान व हिंदवी बाणा परिवाराकडून पत्रकारांचा गौरव व्हावा म्हणून मागील सहा वर्षांपासून पुरस्काराचे नियोजन केले जात आहे. यंदाही सोमवारी ता. (एक) पूरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. यात श्री. पाटिल यांना लोकमान्य टिळक पत्रकारिता पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे. लवकरच एका विशेष कार्यक्रमात मान्यवराच्या उपस्थितीत सदरील पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

# जिल्हा परिषद प्रशालेत करिअर मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील जिल्हा परिषद प्रशालेत विद्यार्थ्यांच्यासाठी कॅरिअर मार्गदर्शन चे आयोजन करण्यात आले होते.यावेळी चंद्रकांत उन्हाळे सरांनी सविस्तर मार्गदर्शन केले यावेळी मोठी माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.इयत्ता नववी दहावी च्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन ठेवण्यात आले होते. सरांनी सविस्तर मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी उज्वल भविष्यासाठी मनापासून कडी मेहनत अभ्यास करणे गरजेचे आहे.मग डॉक्टर इंजिनिअर व अन्य.फॅशन डिझायनर व्हेटनरी डॉक्टर आदि. तसेच ऑनलाईन व ऑफलाईन संदर्भात माहिती देण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक हरिभाऊ दहीफळे, शिक्षकवृंद विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फुलंब्री भाजप शहर कार्यकारिणी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथील भारतीय जनता पार्टी फुलंब्री शहर कार्यकारिणी शहराध्यक्ष योगेश मिसाळ यांनी नुकतीच जाहीर केली. सर्वांना मिसाळ यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. नवीन कार्यकारिणीत शहर उपाध्यक्ष - पंडित नागरे, गणेश राऊत, अजय शेरकर, संतोष आघाडे, संतोष जाधव, नागेश भारद्वाज, संजय पंडित, फारुख शेख, संगिता वाघ, शहर सरचिटणीस सोमनाथ दुतोंडे, आकाश गोरावणे, योगेश इनामदार, रत्नाबाई सोनवणे, शहर कोषाध्यक्ष रविंद्र काथार, शहर चिटणीस सचिन शेरकर किसन गुंजाळ, योगेश सरोदे, पवन शिरसाठ, राजू ढोले, गुलाम पटेल, साहिल गंगावणे, योगेश राजपूत, शहर सोशल मीडिया प्रमुख अभिजीत बनकर, प्रसिद्धी प्रमुख संतोष सुरभय्यै, शहर सदस्य राहुल बनसोड, संतोष ढोले, नवाब पटेल, ज्ञानेश्वर शेरकर, अनिल घरमोडे, राहुल काथार, मनोज राऊत, शाम वानखेडे, संतोष नागरे कृष्णा दुतोंडे, नंदू आढाव, सतीश सोनवणे, प्रकाश घोडके, अनिल वानखेडे, बाळू आढाव, गितेश वाघ, विलास शेरकर, मंगेश काथार, हारुन चाँद शेख, विजय वानखेडे, सोमनाथ दुतोंडे, भगवान वाघ, बाबासाहेब शेरकर, तेजस पाटणी, सागर माठे, मनोज पिंजारी, भास्कर सिरसाठ, सागर शिंदे, सतिष ढंगारे, भगवान कचरु वाघमारे, शहर महिला सदस्या- द्वारका जाधव, अर्चना प्रधान, राधिका मिसाळ, मिराताई काथार, मंदाबाई वानखेडे, अश्विनी जाधव, शमाबाई गुंजाळ, ज्योती राऊत, वैशाली शिनगारे, वैशाली शेवाळे, दुर्गा शेरकर, कोमल सुरभैय्ये, उर्मिला भारव्दाज, मनिषा आघाडे, प्रमिला वाघ, मंगल बनसोड, सिमा सिमंत, मंदाबाई काथार, अलका पंडीत, उषा गंगावणे, ज्योती नागरे आदींची निवड करण्यात आली.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# डॉ.भाई केशवराव धोंडगे हे सामाजिक संत होते

## ह.भ.प. अक्रूर महाराज साखरे

आधुनिक केसरी न्यूज

**कंधार :** जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी माजी आमदार व खासदार डॉ.भाई केशवराव धोंडगे यांनी आयुष्यभर गोरगरीब ,सामान्य अशिक्षित, नाही रे वाले, कुणबी, बळीराजा आठरा पगड जातीसाठी व गाव, वाडी, तांड्यावरील जनतेसाठी सामाजिक कार्य केले म्हणून डॉ .भाई केशवराव धोंडगे यांना सामाजिक म्हटले तर वावगे ठरणार नाही.असे प्रतिपादन ह.भ.प.अक्रुर महाराज साखरे यांनी केले.

दि.१ जानेवारी रोजी जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी दिवंगत डॉ.भाई केशव धोंडगे यांच्या प्रथम पुण्यतिथी निमित्त क्रांतिभुवन बहादरपुरा येथे हरी कीर्तनाचा कार्यक्रम सोहळा आयोजित केला होता याप्रसंगी ते बोलत होते. भाई केशवराव धोंडगे यांनी कधीच जाती व्यवस्था मानली नाही. सामाजिक कार्याबरोबरच ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी शैक्षणिक क्रांति निर्माण केली.गोरगरीबांच्या हजारो मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले.मुलं शिकून आज मोठमोठ्या पदावर कार्यरत आहेत.त्यांचे कार्य आजही समाजासाठी उपयोगी आहे.अशी माणसं समाजातील गोरग रीब,सामान्य,कष्टकरी,कुणबी,नाहिरे वाल्याच्या उद्धारासाठी जन्माला येतात. स्वतःसाठी कोणीही जगते पण धोंडगे साहेबांनी इतरांसाठी जगायला शिकवले. समाज उपयोगी कार्य करा म्हणजे मानवी जीवन समृद्ध आणि सफल होईल असेही ह.भ.प.अक्रूर महाराज साखरे यांनी आपल्या मधुर वाणीने कीर्तनाच्या माध्यमातून उपस्थितांना संबोधित केले.

यावेळी भाई धोंडगेंच्या अर्धांगिनी चंद्रप्रभावतीबाई धोंडगे.माजी आमदार भाई गुरुनाथराव कुरुडे,ॲड.मुक्तेश्वर धोंडगे,प्रा. डॉ.पुरुषोत्तम धोंडगे,प्रा.डॉ.चित्राताई,लुंगारे, प्राचार्य डॉ.अशोक गवते,यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिक व संस्थेतील कर्मचारी उपस्थित होते.भाई केशवराव धोंडगे यांच्या समाधीस्थळी खा.प्रताप पाटील चिखलीकर,आ.श्यामसुंदर शिंदे,आ. तुषार राठोड,आ.राम पाटील रआतओळईकर,आ.मोहन अण्णा हंबर्डे,माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी,विविध विभागांचे अधिकारी लोहा,कंधार तालुक्यातील नागरीक हजारो संख्येने उपस्थित राहून दिवंगत भाई धोंडगे यांना अभिवादन केले.

# ट्रक चालकांच्या संपाचा शाळांना फटका

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** हिट अँड रन कायद्याविरोधात ट्रक ड्रायव्हर्स रस्त्यावर उतरले आहेत. नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच वाहन चालकांसह युनीयने नागपूरसह अन्य ठिकाणी चक्काजाम आंदोलनाला सुरुवात केली आहे. या आंदोलनामुळे अनेक ठिकाणी वाहतूक ठप्प झाली असून याचा फटका शालेय विद्यार्थ्यांना देखील बसला आहे. ख्रिसमसच्या सुट्टीनंतर मंगळवारपासून शाळांना सुरुवात होणार होती. मात्र चालकांचा संप असल्याने शहरातील अनेक शाळांनी आज परस्पर सुट्टी जाहीर केली आहे. मिळालेल्या अधिक माहितीनुसार, ट्रान्सपोर्ट युनियनने सुरू केलेल्या संपाचा फटका शालेय विद्यार्थ्यांना बसत आहे. संपामुळे अनेक पेट्रोल पंपांवर डिझेल उपलब्ध होत नसल्याने विद्यार्थ्यांना शाळेतून ने आण करण्यासाठी असलेल्या स्कूलबस बंद ठेवण्याचा निर्णय स्कूल बस मालक संघटनांनी घेतला आहे. ख्रिसमस सुट्ट्यानंतर शाळा आज सुरू होणार होत्या. मात्र सकाळीच पालकांना संदेश पाठवून शाळेला सुट्टी देण्याचे सांगण्यात आले.

# वंचित अकोल्यातील पोटनिवडणूक लढणार

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त असल्याचे येथे पोटनिवडणूक लागण्याची शक्यता आहे. या ठिकाणी पोटनिवडणूक जाहीर झाल्यास वंचित आघाडीकडून उमेदवार देण्यात येणार आहे, अशी माहिती वंचित आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा प्रवक्ता डॉ. धैर्यवर्धन पुंडकर यांनी मंगळवारी दिली. भाजपचे ज्येष्ठ नेते तथा आमदार गोवर्धन शर्मा यांचे ३ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यामुळे अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त झाली. ही रिक्त जागा भरण्यासाठी निवडणूक आयोगाकडून पोटनिवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने प्रशासनाने तयारी देखील केली. दरम्यान, ही निवडणूक जाहीर झाल्यास ती लढण्याची तयारी वंचित आघाडीने केली आहे. याचा निर्णय वंचित बहुजन आघाडीच्या राज्य कार्यकारिणीने घेतला. या संदर्भात उमेदवारी निवडीची प्रक्रिया लवकरच पूर्ण करून उमेदवाराचे नाव जाहीर करण्यात येईल, असे पुंडकरांनी सांगितले.

# मुख्याध्यापिका एसीबीच्या जाळ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** श्रीमती अर्चना बापुराव जगताप, मुख्याध्यापिका, शासकिय माध्यमिक आश्रमशाळा, अक्कलकोस, ता. शिंदखेडा, जि. धुळे यांना तक्रारदार यांचे कडुन ५,०००/-रु लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ४,०००/-रु लाच स्विकारन्याचे मान्य केले असता, लाचेची रक्कम स्वतः स्विकारतांना त्यांना रंगेहात पकडण्यात आल्याने त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार हे शासकिय माध्यमिक आश्रमशाळा, अक्कलकोस, ता. शिंदखेडा येथे माध्यमिक शिक्षक या पदावर सेवानिवृत्त झाले असून गट विमा योजनेचे मंजुर झालेल्या १,३३,४८४/-रु बिल तकारदार यांना अदा करण्यासाठी उपकोषागार कार्यालय, शिंदखेडा येथे पाठविण्यासाठी श्रीमती अर्चना जगताप, मुख्याध्यापिका हया ५,०००/-रु लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे कार्यालयात दुरध्वनीवर माहिती दिली होती. सदर माहितीवरुन धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागांच्या पथकांने दोंडाईचा येथे जावून तकारदार यांची तकार घेतली होती. सदर तक्रारीची दि. ०१.०१.२०२४ रोजी पडताळणी केली असता पडताळणी



दरम्यान मुख्याध्यापिका अर्चना जगताप यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती ४,०००/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्वतः स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले असुन त्यांचे विरुध्द दोंडाईचा पोस्टे जि. धुळे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक धुळे विभागाचे पोलीस उप अधीक्षक अभिषेक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रुपाली खांडवी तसेच पथकातील राजन कदम, मुकेश अहिरे, संतोष पावरा, रामदास बारेला, प्रशांत बागुल, मकरंद पाटील, प्रविण मोरे, प्रविण पाटील, सुधीर मोरे व जगदीश बडगुजर या पथकाने केली आहे. सदर कारवाईस नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक मा. शर्मिष्ठा वालावलकर, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी व वाचक पोलीस अधीक्षक नरेंद्र पवार यांचे मार्गदर्शन लाभले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

# नालीचे बांधकाम अंदाजपत्रकांनुसार करा

आधुनिक केसरी न्यूज

जुना लोहा ते विठ्ठलवाडी जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील नाली चार वर्षापासून काढली नसून, संबंधित नाली वरील बांधकाम केलेल्या घर धारकांना भरपूर त्रास सहन करावा लागत असून, नाली तुंबल्यामुळे घरमालकांच्या बोर मध्ये नालीचे पाणी घुसत असून बोरच्या पाण्याला भरपूर फेस येत आहे, त्यामुळे घर मालक त्रस्त झाले आहेत . चार वर्षापासून नगरपालिकेला वारंवार विनंती करूनही काहीही फरक पडला नसल्यामुळे संबंधित घरमालकांनी आपल्या घरातील बाथरूमचे आउटलेट पाणी बाथरूम मध्ये जाम झाल्यामुळे पाईप कोंडून बसला असल्यामुळे संबंधित नाली बुजवून पाणी रोडवर सोडण्याचा मनोदय व्यक्त केला आहे .

**लोहा :** आजघडीला लोहा शहरातील विविध विकास कामांसाठी शासनाकडून नगर परिषद कार्यालयास निधी प्राप्त झाला असून त्याअंतर्गत शहरातील रस्ते तसेच नाल्यांचे काम वेगाने सुरू असताना दुसरीकडे स्थानिक लोकप्रतिनिधींच्या लुडबूडतेने कामाची गुणवत्ता ढासळत असून वाटेल तसे कामे करून गुत्तेदार मोकळे होत असल्याने स्थानिक नागरिकांनी रस्ता नाली कमावराच शंका व्यक्त करत सदर कामाच्या अंदाज पत्रकानुसर काम करण्यात यावे या मागणीसाठी दि. २ जानेवारी पासून लोहा नगर परिषद कार्यालयासमोर साखळी उपोषण आरंभिले आहे.

लोहा पालिकेकडून शहरातील विविध भागात अंतर्गत विविध विकास कामे सुरू असून त्याच अंतर्गत लातूर रस्त्यावरील शनी मंदिर पासून शिक्षक कॉलनीकडे जाणाऱ्या रस्त्याचे व नालीचे काम सुरू आहे. सदरील रस्त्याचे काम हे अंदाजपत्रका प्रमाणे पंचवीस फुटांचे झाले. मात्र नाली बांधकाम हे अंदाजपत्रका प्रमाणे न करता रस्त्या लगतच्या घरांच्या सोई नुसार होत असून नाली बांधकामामुळे रस्ता अरुंद होत असल्याने शिक्षक कॉलनी भागातील नागरिकांना जाण्यासाठी पुढील काळात त्रास होऊ शकतो. त्यामुळे शनी मंदिर ते बाबर यांच्या घरानजीक असलेल्या महावितरणच्या रोहित्रा पर्यंत पूर्ण नाली ठराविक अंदाज पत्रकानुसार करण्यात यावी. तसेच अडथळा येणारे बांधकाम, ओटे, गॅलरी काढून काम पूर्ण करावे या मागणीसाठी दि. २ जानेवारी मंगळवार पासून लोहा पालिका कार्यालयासमोर साखळी उपोषण आरंभिले आहे. निवेदनावर शिवसेना शिंदे गटाचे उप शहरप्रमुख शिवराज पाटील मुंडकर, सदानंद पांडे, अमोल शेंडगे, विजय गवाले, राजेश जाधव यांच्या स्वाक्षरी आहेत.


गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर